म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
क्र. ७७०



REFBK-0005369

बाबुलनाथ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
स्थळ प्रत
सं. क्रमांक
ता.
ठाणे.
नोंदणी नंबर ३०२०

# आकाशगंगा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
द्वि. क्र. ५३६९

बाबुलनाथ

REFBK-C005369

REFBK-0005369

१९३५

रा. शा. काळे, बी. एससी.
काळे ब्रदर्स, रास्ता पेठ, पुणें

किंमत बारा आणे

प्रकाशक—

रामचंद्र शामराव काळे, बी. एस्‌सी.,

काळे ब्रदर्स, रास्ता पेठ, पुणें

प्रथमावृत्ति

या व पुढील आवृत्तींचे सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन. अनुमतीवांचून यांतील कोणतीही कविता कोणीं प्रसिद्ध करूं नये अगर तिचें भाषांतर करूं नये. केल्यास कायदेशीर इलाज करण्यांत येईल.

मुद्रक—

लक्ष्मण नारायण चापेकर,

'आर्यसंस्कृति मुद्रणालय'

१९८ (१७), सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणें २

मातृचरणीं

# जरूर तेंच—

श्री. बाबुलनाथ 'कवि कसे झाले' हें 'चिमणरावी चऱ्हाट' प्रासंगिक प्रस्तावनेच्या पोतडींत न कोंबतां अगर पन्नासपानी अल्प (!) 'परिचया'च्या पांघरुणाखालीं ऐसपैस हातपाय पसरून 'प्रथमच' रसिकांचा कोंडमारा न करतां प्रस्तुत प्रसंगीं फक्त 'जरूर तेंच' करण्याचें योजिलें आहे.

पुस्तकप्रकाशनाचे कामीं सुप्रसिद्ध साहित्यसेवक गुरुवर्य प्रो. श्री. नी. चापेकर, प्रो. शं. के. कानेटकर (गिरीश), नाटककार स. अ. शुक्ल (कुमुद-बांधव), प्रो. वि. मा. दी. पटवर्धन, श्री. ग. ह. पाटील, श्री. वा. भा. पाठक, कादंबरीकार श्री. द. र. कवठेकर, श्री. गोपीनाथ तळवलकर व मौजेचे सहसंपादक श्री. अ. सी. केळूसकर यांनीं आपुलकीनें ज्या मार्मिक सूचना केल्या व प्रोत्साहन दिलें त्याबद्दल त्या सर्वांचा सदोदित ऋणी राहण्यांतच मला धन्यता वाटते.

ह्या कवितासंग्रहांत निवडलेल्या सर्व कविता निरनिराळ्या मासिकांतून व साप्ताहिकांतून वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांतल्या त्यांत पुष्कळ कविता 'विविधज्ञानविस्तार', 'विविधवृत्त' व 'विहार' ह्या नियतकालिकांत प्रसिद्ध करून सदरहू मासिक पत्रांच्या संपादकांनीं कवीस जें उत्तेजन दिलें त्याबद्दल त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत. तसेंच इतर प्रमुख मासिकांतून व साप्ताहिकांतून कांहीं कविता प्रसिद्ध केल्याबद्दल त्या त्या संपादकांचाहि मी आभारी आहें.

पुस्तकाचें मुखपृष्ठ सजविण्यासाठीं सुप्रसिद्ध आर्टिस्ट श्री. गो. म. भांबुरकर यांनीं जी मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानून हा कवितासंग्रह मी रसिकांना अत्यंत प्रेमादरानें सादर करतों.

प्रेमळ रसिक व निर्भीड टीकाकार ह्या पुस्तकाचा 'योग्य' तो समाचार घेतील अशी आशा आहे.

—राम काळे

# आकाशगंगेतील तारका


| कविता | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| आई | ... | ... | ... | १ |
| सावकारी | ... | ... | ... | ३ |
| तारके ! जाशी का चमकून ! | | ... | ... | ४ |
| पाहुणचार | ... | ... | ... | ५ |
| प्राजक्ताचीं फुलें | ... | ... | ... | ६ |
| कॉलेजांतील सुख | ... | ... | ... | ८ |
| किल्ल्यावरून कोसळलेल्या खडकांस— | | ... | ... | १० |
| चोरटी | ... | ... | ... | ११ |
| वठलेल्या वृक्षास— | ... | ... | ... | १२ |
| म्हातारचळ | ... | ... | ... | १३ |
| निंदकांस— | ... | ... | ... | १५ |
| अंगाई गीत | ... | ... | ... | १६ |
| हें चित्र पहा ( कवि आणि वस्ताद ) | | ... | ... | १८ |
| तें चित्र पहा ( कवि आणि मर्कट ) | | ... | ... | १९ |
| रुष्ट सुंदरीस— | ... | ... | ... | २० |

| कविता | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| एखाद्या कवीचें नशीब | ... | ... | ... | २१ |
| उंदीर पकडो ! | ... | ... | ... | २२ |
| भिक्षुकांस निमंत्रण | ... | ... | ... | २४ |
| गुंफलेली माळ | ... | ... | ... | २६ |
| कोण हे आई ! | ... | ... | ... | २७ |
| फुलबाग | ... | ... | ... | २९ |
| गाजराची पुंगी | ... | ... | ... | ३३ |
| ध्यास | ... | ... | ... | ३५ |
| स्मशानांतील डोंब | ... | ... | ... | ३७ |
| तेव्हां आणि आतां | ... | ... | ... | ३९ |
| पंढरिचा वारकरी | ... | ... | ... | ४० |
| स्मृति-गीत | ... | ... | ... | ४३ |
| पाय घसरला म्हणून– | ... | ... | ... | ४४ |
| विरहगीत | ... | ... | ... | ४६ |
| पैशासाठीं | ... | ... | ... | ४८ |
| शेवटची आशा | ... | ... | ... | ५० |
| पुणेरी पगडी | ... | ... | ... | ५१ |
| करुण कहाणी | ... | ... | ... | ५२ |
| उंच झालों म्हणून– | ... | ... | ... | ५८ |
| येउं नको ग दडून् ! | ... | ... | ... | ५९ |
| यशाचा मार्ग | ... | ... | ... | ६१ |
| तात्या पंतोजी | ... | ... | ... | ६३ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| एका गरीबाचें मागणें | ६४ |
| अविवाहित राहिलों जर– | ६६ |
| विवाहित झालों तर– | ६७ |
| –स | ६८ |
| आवाज | ७० |
| भ्रमर | ७३ |
| उंदराची मावशी | ७५ |
| पत्नी-प्रेम-विहार | ७६ |
| कवि हा सृष्टीचा गवई | ७८ |
| पत्रें लिहिलीं तर– | ८० |
| वधूसंशोधन | ८१ |
| मी आणि मिशा | ८२ |
| गांधिलमाशी | ८४ |
| मळमळ | ८६ |
| कवितागायन | ८९ |
| तारका | ९० |

## शुद्धिपत्र

पान ३० ओळ ९ ' पूर्णानंद ' बद्दल ' पूर्णानंदें' वाचावें.
" ४५ " ११ ' नका ' बद्दल ' नको ' वाचावें.
" ६४ " १२ ' दिसेना कुठें ना एक ' बद्दल ' दिसेना कुठें एक ' वाचावें.



मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. काव्य नं. ११२८
ता. ...............

# आकाशगंगा

मराठी ग्रंथसंग्रहालय
स्थळ प्रत
नं. ग्रा.प.नं. ९९२८
ता.
ठाणे
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
नोंद नं. ५३२०
५३६८

# आई

वृत्त—सुमंदारमाला

आई ! मला जन्म देऊनियां तूं जगाच्यापुढें आणिलें जेधवां
केलें खरें पुण्य मी पूर्वजन्मीं असें वाटतें खास माझ्या जिवा !
माझ्याचसाठीं किती यातना गे ! तुला लागल्या भोगण्याला बरें ?
मना कल्पना येत नाहीं तरीही – फुलाहूनि संरक्षिलें आदरें !

बाल्यामधें अंतरीचा जिव्हाळा तुझा लागुनी हांसलों, खेळलों
केलें घराला पुरेपूर तेव्हां क्षणीं प्रीतिला पात्र मी जाहलों !
अविश्रांत खोडया अहोरात्र केल्या दिला त्रास सर्वांस अत्यंत मीं
पोटामधें दोष घालून सारे न केलेंस कौतुक केव्हां कमी !

फिरे घार आकाशमार्गीं तथापी तिचें चित्त सारें पिलांच्यावर
घरांतलि कामांमधें दंग तूंही तरी ठेविलें लक्ष माझ्यावर !
तेजोनिधी दिव्य देवांगना तूं सुधा आणुनी चंद्रलोकांतली
जणूं ज्ञानसंवर्धनाच्या मिषानें मला दुग्धपानापरी पाजली !

निर्दोष वात्सल्यभावामुळें त्वत्हृदींचा करूनी मला पाळणा
वारा न लागूं दिला अल्पसाही कशी सांग केलीस जोपासना ?
तुझी जागती ज्योत माझ्यासभोंतीं; पवाडे जुन्या काळचे गाउनी
कुलाचें मला नांव राखावया खास संचारशी शक्ति-सौदामिनी !

निद्रिस्त मी ; दाखवीशी मला तूं खरा शिस्तिचा मार्ग मोक्षप्रद
होई तुझ्या शिक्षणानेंच माझें सदा ज्ञानभांडार वृद्धिंगत !
क्षमा, शांततेचे, मनोधैर्यतेचे– तसे स्वाभिमानी धडे देउनी
विस्तारण्या भावना अर्पिशी तूं मनोमोहिनी स्फूर्ति–मंदाकिनी !

होती गरीबी स्थिती त्यांतुनीही निभावून नेलेस ते दुर्दिन
पतीच्यासवें गोड संसार केला यशःश्री घरा तूंच गे आणुन !
वैधव्य आलें कपाळीं तरी तूं प्रसंगांस त्या तोंडही देउनी
हृत्सागरीं दुःख तें सांठवीलें– तुझ्या मुग्ध बाळांकडे पाहुनी !

घणाचे जगीं घाव तूं सोसल्यानें खरें देवतारूप लाभे तुला
तुझ्यावीण नाहीं मला देव कोणी, तुझ्या थोरवीला जगीं ना तुला !
तुझें प्रेम निर्व्याज, आनंददायी तयाचे पुढें व्यर्थ सारें जग
तुझ्यावीण माया खरी ना कुणाला, नसे अन्य वा कोणि संरक्षक !

अमर्याद आभार आई ! तुझे ते–कळेना तुझ्या बालकाला जरी
खात्री पुरी होय ! ना फेड त्यांची कधीं व्हायची जन्मजन्मांतरीं
जिवालागिं अत्यंत कांट्यापरी हें सदा टोंचतें शल्य रात्रंदिन
तुझी होइना अल्पही योग्य सेवा जरी व्यर्थ जाती क्षणानुक्षण !

क्षमेची सदा याचना मीं करावी–क्षमा तूं किती दाखवावी पण ?
आई ! मला देई आशीर्वचाला, करी वत्स हा गे तुला वंदन !
सामर्थ्य येवो शरीरांत माझ्या तुझे फेडण्या पांग थोडे तरी
आयुष्य लाभो तुला दीर्घ आई ! –टिकाया कृपाछत्र माझ्यावरी.

प्रकाशन—विविधज्ञानविस्तार; काव्यरत्नावली; ज्ञानप्रकाश

# सावकारी

वृत्त—**वारुणी**

( कवि—**यशवन्त** ! —असू द्या माफि, करा दिलसाफि )

येइ भाई येथ पाहीं थाटली ही सावकारी
धर्म-जाती येथ कांहीं भेद ऐसा ना विकारी !
दैन्यतेचा हा कडाखा दुर्दशा होई जिवाची
ह्या जगीं पैसाच त्राता त्याविना प्राणी भिकारी !

खर्चराशी जीवनीं बोकाळुनी त्या गांजताती
तुंबते बाकी सदा अन् होइ देणें दारिंदारीं !
तोंड ना ये दाखवाया भंडवीतो दंडधारी
दीन बंधो ! मांडिली ही तूझियासाठीं उधारी !

खानदानी शेठ कोणी वंशजी त्यांच्याच पेढ्या
थाटल्या काढून सोयी सवूलतीच्या बेसुमारी !
नाडल्या जीवांस येथें द्यावयातें कर्जपाणी
मारवाडी मात्र माझें व्याज; ही माझी खुमारी !

थोडिशी वा फारही घे कर्जसंख्या लागणारी
मुक्त कर्जातून हो त्या ! येउं दे अंगीं हुषारी !
फेडतां सव्याज देणें होउनी नादार अंतीं
जो दगा देशील दुष्टा ! तेवढी हानी हमारी !

प्रकाशन- विहार

## तारके † ! जाशी का चमकून ? चाल—पांखरा येशिल का

तारके ! जाशी का चमकून ? ॥ ध्रु० ॥
सुखदुःखाच्या गृह-गगनीं ह्या
उदयातें येऊन ! तारके ॥
बाळपणींचा खेळ मजेचा
ऐन रंगिं उधळून ! तारके ॥
प्रेम जिवाचें, निर्मल साचें
जिवां–जिवां जडवून ! तारके ॥
तव तेजें गृह ' गोकुळ ' गमलें
सौख्य सदा वितरून ! तारके ॥

* * *

' काळ-सूर्य ' जरि तुजला दिपवी;
संधि सुधी साधून—
तारके ! येशिल का परतून ?
' शुक्र चांदणी ' अरता जाते—
येइ पुन्हां परतून !—
तारके ! येच तशी परतून !

प्रकाशन— काव्यरत्नावली

( † माझी पुतणी, वय वर्षे ४ )

स्वत्र प्रत
नं. ग्रा.ग्र.नं. ९१२८
ता.
ठाणे.
१३२०

# पाहुणचार

पौराणिक काळांत प्रभू रामचंद्रासाठीं शबरीनें केलेल्या आदरातिथ्याची पूर्व-तयारी व हल्लींच्या सुधारलेल्या काळांत पाहुण्याच्या आगमनाची चुणुक लागतांच होत असणाऱ्या स्वागताची पूर्वतयारी यांमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर असल्यास आश्चर्य तें काय ?– हा काळाचाच प्रभाव !

" मुलांनो ! पाहुणा कोणी उद्यांला एक येणार
घराला खर्च ह्या आतां पुरा गांजून घेणार !
तुम्हां कोठूनियां ठावा कसा तो पाहुणा आहे ?
भटाला ओसरी देतां पथारी मांडुनी राहे !

उद्यां पाहाल डोळ्यांनीं सुखें तो घेत आराम
मनीं लागाल चिंताया ' कधीं बोलेल हा राम ! '
बघोनी 'काळ' तो ऐदी मला संताप येईल
चुकोनी त्या भरामाजी नको तें तोंड बोलेल !

तुम्हीं योजाल ना युक्तया ! 'नको तो यावया करुनी'
पहा परगांव गांठाया तयारी आज 'तिकडोनी' !
कुठें गांवास 'ते' गेले– कशाला–केधवां ? कांहीं
विचारी पाहुणा जर तो-( कसें बोलुं ग मी बाई ? )

उद्यांला पाहुणा येवो ! तुम्हां आधींच घेऊन
खुलें हें दार ठेवोनी; सुखें माहेर गांठीन !! "

प्रकाशन— वसुंधरा

## प्राजक्ताचीं फुलें

जाति—बालानन्द

पाउस पुष्पांचा कसला जिकडे तिकडे हा पडला ?
शुभ्र फुलें प्राजक्ताचीं नाहिं कुणाच्या प्रीतीचीं ?
उठुनी झोंपेंतून झणीं वेंचाया ग सर्वजणी
एकदिलानें
आनंदानें
उत्सुकतेनें
लगबग करुनी मौजेंत चला सख्यांनो ! बागेंत

प्रभात मंगलमय सजली सृष्टीवर ह्या अवतरली
गुलाल फेंकित गगनांत उदयां ये रवि तेजांत
किरण कोंवळे
त्याचे सगळे
रंग निराळे
उधळुनि देती चहूंकडे मोत्यांचे जणुं दिव्य सडे !

बाग आपुली छोटीशी दिसते आतां गोड कशी ?
प्राजक्ताचीं फुलें किती हिरव्या वृक्षांवर खुलती ?
कळ्या कोंवळ्या
जणुं त्या टिकल्या
शालूवरल्या !
लखलख करुनी दाहि दिशां उडवुनि देती निज तेजा !

चंचल तारा पहांटच्या दीपकमाला गगनाच्या
शुभ्र फुलें तारे गमती शोभा झाडांना देती
अरुण-प्रभा ती
बघतां पुढती
तारा तुटती !
नील नभांतुन निखळोनी;— तशीं फुलें वृक्षांवरुनी !

तारा गगनाच्या तुटल्या कोठें जाउनियां दडल्या ?
प्राजक्ताचीं फुलें ! फुलें ! तारे दुसरे हे खुलले
रविरायाचें
स्वागत साचें
करावयाचें
म्हणुनी घेती काय उड्या— मैदानावरती उघड्या ?

सुंदर, सोज्वल, सुकुमार सर्व फुलांतुनि गुलजार
फुलें सख्यांनो ! हीं असतीं शुभ्र स्फटिकां लाजविती
झाडांखालीं
सभोंवतालीं
भूमी फुलली !
प्राजक्तांचे चहूंकडे सौगंधाचे पडुनि सडे !

उठा ! उठा ! ग ह्या समया फुलें सर्वजणि आणूं या
सुकुनी ना तीं जातील ! अखेर मातींत मिळतील !
सार्थक त्यांचें
ह्या जन्मींचें
करावयाचें
म्हणुनी आपण त्यांस क्षणीं वाहूं देवाच्या चरणीं ! !

प्रकाशन— ज्ञानप्रकाश

## कॉलेजांतील सुख

जाति–केशवकरणी

'कॉलेजांतील सुख' हें 'शेतकींतील सुखा'पेक्षां लाखों पटींनीं सुखकर असतें–असा कोणता कॉलेज-कुमार कबूल करणार नाहीं ?

दक्षिण–उत्तर मंद मंद तो वाहे जलवाहक
कालवा सरितेचा बालक !
मागें ती टेकडी तियेच्या खालीं झाडींतुन
आमुचें सुरम्य 'फर्ग्यूसन' !
चहुंकडे आवारामधें हवा ती खुली
विविधशा फुलांनीं बाग मधें शोभली
त्यांतुनी तरूंवर गाते विहगावली
विद्यादेवीचें स्थल ऐसें नंदनवन भासलें
म्हणोनी गाणें हें गाइलें. !

शाळेनंतर इथें शिकाया गांव; जनां सोडुनी
राहिलों वसतिगृहीं येउनी !
स्वतंत्रता–साम्राज्य बघूनी माजिव वेडावला
चालला नित्यक्रम हा भला—
उठुनियां उशीरां टेनिस तें खेळणें
स्वादिष्ट भोजनें क्लबामधें झोडणें
'क्लासां'त 'सुटा'नें घंटेला पोंचणें
लहर लागतां तास बुडवुनी गांठुनि लायब्ररी
वाचणें नाटक, कादंबरी !

'सिगार, स्नफ्' ओढीत करावी सहल मजेनें कधीं
मुलींसह रंगुनि प्रेमामधीं !
नाटय-सिनेमा रोज बघावा मित्रासह जाउनी
करावी चैन तशी 'खाउनी' !
'रोमान्स' करावा त्यांतुनि तो सुंदर
लागेल तशी मागणें 'मनीऑर्डर'
टाळणें परीक्षा जडुनि 'परीक्षा-ज्वर'
लाख पटींनीं हें न सुखद् का कॉलेजी जीवन ?
नको तें खेड्यांतिल राहणं !

प्रकाशन— विविधवृत्त ( फर्ग्युसन कॉलेज, १९२९ )

# किल्ल्यावरून कोसळलेल्या खडकांस—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

गांवापासुनि दूरदूर वसलें जें स्थान शांतिप्रद
त्या ठायीं खडका ! निवास तव हा होई कसा संतत ?
दैवाच्या फिरत्या गतींतुनि तुझें आयुष्य जें चाललें
सन्मार्गास्तव तें मला गमत कीं देवाकडे गुंतलें ।

सानिध्यास तुझ्या चिरंतन दिसे देऊळ सन्मंगल
झाडें ज्याभंवतीं फुलें उधळती वायूसवें मंजुळ
तूंही निश्चल तापसासम इथें होतां समाधिष्टित
येई देवकळा अपाप तुजला लागून सत्संगत !

'केलें कार्य जसें-तसें फल मिळे' जो दाविशी प्रत्यय
ती ये कामगिरी तुझी स्मरुनियां—नाहीं कधीं ज्यां लय !
येथूनी दिसतो 'अजिंक्य' म्हणुनी तूं त्याच किल्यावर
होता भव्य कडा धरून तिथल्या ईशान्य बुर्जावर !

त्या काळीं जरिचें निशाण भगवें किल्ल्यावरी शोभलें
काळाला रुचलें न तें उलट तैं अन्यांस कीं योजिलें !
येई मोंगल-भूप चाल करुनी दक्षीण देशांतुन
हल्ला तो चढवी अचानक तदा किल्ल्यास ह्या वेढुन !

गेले लोटुनि तीन चार महिने चालू लढाई जरी
किल्ला होइ न मोंगलांस वश तो, कांहींहि केलें तरी !
क्रांती होय खरी सुरुंग उडतां ईशान्य बुर्जावर
तूं वेशी खडका ! धडाडुनि उडी धांवून शत्रूंवर !

होता निर्जिव तूं तरी निजबळें 'स्वातंत्र्य' राखावया
केली मर्दुमकी रणांत पडुनी शत्रूंस मर्दूनियां !
( दैवानें यवनांस ये यश जरी- ) तूं चित्र जें काढिलें
चैतन्यास्तव तें निरंतर हृदीं कोरून मीं ठेविलें !!

प्रकाशन—काव्यरत्नावली ( सातारा )

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
क्र. क्रमांक नं. ११२२
ता. ............
ग्रा. प्र.

मराठी ग्रं... ग्रंथालय
क्रमांक ५३२८

जाति—मनी

## चोरटी

येते माझ्या घरीं— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

घर हें माझें गजबजलेलें
त्यांत तियेची ये जा चाले
मनीं न येतां संशय कसले

मौज वाटते परी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

खमंग येतां वास कोठुनी
कपाट, खिडक्या बघे शोधुनी
मिळेल जें तें गट्ट करूनी

देते हातीं तुरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

जेव्हां तिजला कांहिं न मिळतें
गुरकुनि ती अंगावर येते
कधीं कधीं तर ओरबाडिते

मस्त जाहली खरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

उंदिर शिरतां घरांत जेव्हां
राखुनि परि ती इमान तेव्हां
लढवुनियां तो गनिमी कावा

करी शिपाईगिरी— सख्या ! ही कोण चोरटी तरी ?

प्रकाशन—वसुंधरा

( श्री. मंगसुळीकरांचा 'चोर' ह्या 'चोरटी'ला ओळखून घेवो ! )

## थठलेल्या वृक्षास—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

ऐशी हीन दशा तुझी दिसत कां वृक्षा ! हिंवाळ्यामधें ?
तेजाचा लवलेशही न झळके तूझ्या शरीरीं कुठें !
पानें, मोहर, पालवी नव, फळें जीं शोभणारीं तुला
गळीं ह्या समयीं झडून म्हणुनी कां खिन्न तूं जाहला ?
आनंदप्रिय तो तुझा समय रे ! कोठें वसंतांतिल ?
पक्षी मित्र तुझ्यावरी विहरले स्वच्छंद रात्रंदिन !
आतां तूं दिसतोस रुक्ष म्हणुनी पाही तुला ना कुणी
येतां संकट तें सहाय्य करण्या कोणी न ये धांवुनी !

* * *

बोलूं मीच तुला कशास्तव बरें ? मद्भाग्य हें संप्रती—
आहे त्वत्सम; जाळितो मम जिवा हा काल दैन्यांमधीं !
"जों आहेत शितें-भुतें तंववरी" न्यायानुसारें अतां
कोठें मित्र मला जगांत उरला ? द्याया मना शांतता !
काळाची करणी कठोर जगतीं ना दोष माझा तुझा
जी दे देव स्थिती तयांतुनि सदा आनंद मानायचा !
नाहीं कृष्ण ढगाविना नभ, तसें दुःखाविना जीवित
दुःखाच्या तिमिरीं कधींतरि शशी येईल तो हांसत.

प्रकाशन— ज्ञानप्रकाश

# म्हातारचळ

जाति—मुद्रिका

(भूमिका—पेन्शनर)

वय साठ सरूनी जरी येइ वृद्धता
वरिवरी जरठ हा दावी तरुणाची ती आढ्यता !
बोळकें मुखाचें बने कधींचें तरी
लावुनी दांत नकली ते करि चर्या तो हांसरी !
डोक्यास पांढऱ्या सदा 'कलप' चोळितो
कुळकुळीत केसांचा नी वांकडा भांग पाडितो !
वाढत्या मिशांना तशी चाट देउनी
गालांस मर्दितो 'स्नो' नें वर 'पावडर' ती फासुनी !
पोषाख घडीचे तसे बदलतो किती
गणती न तयाला कांहीं फिरण्यास निघे हा कधीं !
चालती देवळांमधें पुराणें, कथा
हा बगळा तेथें जाई सद्धेतूनें ना कदा !
धार्मीक ग्रंथ ते घरीं पडति धूळित
'नाटकें–मासिकें–माला' वाचतो हंसत खेळत !
मिष्टान्न गोड खावया रोज नवनवें
डोहाळे त्याला होती जें दिसेल तें तें हवें !
रावती घरांतुनि किती गडी माणसें
हा दोष काढुनी त्यांना बोलतो मुखीं ये जसें !
समजतो स्वतःला शिष्ठ आजोबा कुणी
'उपदेश–डोस' तरुणांना पाजतो बळें हा मुनी !

होतांच रात्र ती तया अचुक फावते
बाहेर घराच्या त्याचें मन खुशाल तें रंगतें !
तो नाट्य-सिनेमा सदा बघत हिंडतो
कधिकधीं वेष बदलोनी ना तमाशाहि सोडितो !
धन आजवरी मिळविलें करुनि नोकरी
उधळून सर्व तें आतां 'मुंबई जिवाची करी ' !
नुकतीच बायको जरी जाय सोडुनी
सारखी वृत्तपत्रीं घ्या जाहिरात ही वाचुनी—
'पाहिजे वधू' सुंदरी, सुशिक्षित खरी
अट जात, वयाची नाहीं—( चालेल पोर पर्करी ! )
जमतें न लग्न तो तरी व्यर्थ हिंडतो
जी दिसेल स्त्री तिजला तो बारकाइनें पाहतो !
तो पुनर्विवाहाप्रती सज्ज होतसे
'होईन सुधारक मोठा' ! बोलतो ऐटिनें असें !
जमवून कुठें द्या अतां तयाचें तुम्हीं
तो येइ हातघाईला वा करिल जिवा कांहिंही !
मरतांच असा तो वृथा भूत होइल
अन् बसून मानगुटीला कोणास तरी घेरिल !

प्रकाशन—वसुंधरा

## निंदकांस—

वृत्त—**वसन्त**

कशीही चालु दे टीका अतां रे निंदका ! तूझी
अजूनी काव्य-रचनेची न पूर्ती जाहली माझी !
लिहाया बैसलों जेव्हां मराठी काव्यसंभार
मनीं ती कल्पना नव्हती तुझा लाभेल शेजार !

परी ह्या काव्यप्रारंभीं तुझी ती झोड टीकेची
बघूनी अंतरीं माझ्या सुखानें उसळती वीची !
जरी मी होइं एकांगी; तुझ्यावांचूनियां साचें
करावें काव्य मीं कैसें ? करोनी चीज ना त्याचें !

कळाया सर्व लोकांना कवीचें काव्य तें गोड
अशा ह्या योग्य संधीला तुझें शस्त्रास्त्र बिनतोड !
मिळाली जोड जर मजसी तुझ्या त्या तीक्ष्ण टीकेची
पुरे ती खास ईर्ष्येनें कराया पूर्ति काव्याची !

तुझी ती चंद्रिका-टीका जरी राहील ना फुलती
जगीं मत्काव्य-सिंधूला कशी यावी बरें भरती ?

प्रकाशन—**सत्यवादी**

# अंगाई गीत

जाति—अवनी

नीज नीज रे चिमण्या ! घोर रात्र होई ! ध्रु०॥

खेडयांतिल भाइबंद
कामाविण ज्यां न छंद
झोंपलेत पार धुंद
देख ठायिं ठायीं !

घरट्यांतुनि विहगवृंद
किलबिल ना करिति शब्द
पवन मात्र सुटुनि मंद
गोड गान गाई !

सृष्टि, गगन एकजात
शांततेंत विहरतात
रातकिडे व्यर्थ त्यांत
अशुभ देति ग्वाही !

सदनांतुनि चोंहिकडे
खडखडती उंदिर ते
फसुनि व्यर्थ त्या ध्वनितें
श्वान भुंकतीही !

तरु डोलति थोर सान
सळसळतें पान पान
नीट त्यांस देत कान
झोंप शांत घेई !

चोंहिंकडे गगनांतुन
तारा त्या चमचमून
'झोंप सुखें' तुज वदून
एक एक जाई !

गाउं किती गान बोल ?
झोंप यावयास डोल
उघडुं नको नयन-गोल
झांकुनीच घेई !

राहिं उगा, रडुं नकोस
घेतें तव चुंबनांस
मन्मनिंची पुरविं आस
करुनि 'गाइ ! गाई !'

प्रकाशन— आनंद

## हें चित्र पहा—

१५—शार्दूलविक्रीडित

ह्या दोन 'सुनीतां'तील कल्पना माझ्या एका 'सुतकाळ' कारकून मित्रास एकाच वेळीं सुचलेल्या आहेत. मात्र त्याला कविता 'होत' नसल्यामुळे त्यानें हें काम 'अंमळ' माझ्यावर सोंपविलें. अर्थात् तें माझ्या हातून कितपत पार पडलें हें खुद्द रसिकांनींच ठरवावें !

—१—

### कवि आणि वस्ताद

गर्जे ठोकुनि दंड कोण कविला वस्ताद जाडाजुडा —
"माझें साम्य तुझ्यामधें दिसतसे हा व्यर्थ नाहीं लढा !
आखाड्यांत पडूनि नित्य असतो व्यायाम घेण्यास्तव
तूंही ना कवि-मंडळांत रुळशी काव्यें करायास्तव ?

होतों खाडनि लठ्ठ मी निशिदिनीं खर्जूर अन् खोबरें
घेऊनी परकल्पना नविन ना तूं श्रेष्ठ होशी बरें ?
कुस्त्या मारुनि मी सदैव मिळवीं फेटे तसें कंकण
तूंही मासिक-पुस्तकांत इतरां हाणून घेशी धन !

घेतों हे मम कान मी चढवुनी ऐटींत चालावया
घेशी वाढवुनीच मान अपुला गर्वांत मिर्वावया !
चेले मी करितों तयार, बनुनी त्यांचा गुरू सज्जन (!)
तूंही ना प्रसवावयास झटशी चेले, गुरू होउन !"

* * *

"वस्तादा ! सगळें खरें–, कवि वदे–तुझ्यापरी रे कुणी–
खांद्याच्यावरुनी जिवंत मजला मिर्वी न रस्त्यांतुनी !!"

प्रकाशन— विविधवृत्त

आणि—

मराठी ... ग्रं.
स्थळ प्रत
क्रं. ...... नं. ......
ता. ......

तें चित्र पहा—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

— २ —

## कवि आणि मर्कट

बोले खाउनि दांत सर्व कविला गर्वें कुणी मर्कट—
" माझें साम्य तुझ्यामधें प्रकटतें–हें व्यर्थ ना तर्कट !
दोघेही दिसण्यांत एक अगदीं ! आश्चर्य कोठें न कीं
आम्हांपासुनि जाहलीच तुमची उत्पत्ति साऱ्या जगीं !
उद्यानीं फिरतां फळें खुडुनियां पोटामधें घालतों
तूंही चोरुनि शब्दवैभव तसें काव्यामधें कोंबतो !
आहे पुच्छ म्हणून मी करितसें उड्डाण चोंहींकडे
कीर्ती-पुच्छ मिळूनि ना मिरविशी प्रौढी जनांच्यामधें ?
वांकोल्या मज दावितांच चिडतों अत्यंत रागावुनी
टीका हो तुझियावरी तर कसा जातोस फेंदारुनी ?
झालें कांहिंतरी विषाद न मुळीं त्याचा कधीं मानतां
'माझें × × × लाल'–तत्त्व अपुलें वारूनि नेई व्यथा ! "

* * *

" दोस्ता ! हें सगळें खरें,–कवि वदे,–मी ना सुखी अल्पही
टाकी टर्फेल ना कुणी मजपुढें खाऊनियां शेंगही ! ! "

प्रकाशन—विविधवृत्त

## रुष्ट सुंदरीस—

जाति — मोहिनी

बोल ! बोल ! आतां सखये ! सोडुनी अबोला
प्रेम-हांक एकच देई हृदय-वल्लभाला ! ॥ ध्रु० ॥

घोर रात्र नैराश्याची जाय ओसरोनी
दिव्य, सौख्य, आनंदाची प्रभा ये फुलोनी
दिशा पूर्ण साऱ्या हंसती मोकळ्या मुखांनीं
हाय ! तूंच कैसें वरिलें मौन त्या व्रताला ?

गोड गान जिकडे तिकडे मधुर सुस्वरानें
विहग गाति वृक्षांवरुनी उडुनि कौतुकानें
सूर तोच संगीताचा गावया जुटीनें
चालशील आळा मानिंच्या कधीं रोदनाला ?

एकजात फुललीं पुष्पें; विश्व जणूं डोले
वास गोड मकरंदाचा दरवळून खेळे
भ्रमर त्यांत फिरुनी जे जे करिति प्रेम-चाळे
अर्थ तोच तव जीवाला–उकलवूं कशाला ?

नभांतून दंव मोत्यांसी ढाळतात तारा
लता बागबगिच्यांमधुनी फुलांना झरारा !
ग्रहण-योग संपुनि, टाकी अश्रु-प्रेम-धारा
भेट रोहिणी दे चंद्रा !–धीर ना मनाला ! !

प्रकाशन—ज्ञानप्रकाश; विहार

## एखाद्या कवीचें नशीब

वृत्त—शार्दूलविक्रीडित

कांहीं थोर कवी सदा झळकती मासीक-पत्रांतुनी
कांहीं येति पुढें-कुणीं रसिक त्यां डोक्यावरी घेउनी !
कांहीं लावुनि बैसतात वशिला छापावया काव्य तें
एखादा ' कवडा '† कवी न ठरुनी-जाई दडूनी कुठें !
संस्थानीक महा-कवींस धरिती राजाश्रयीं आपुल्या
कोणाला कवितेवरी मिळकती होतातही चांगल्या
कोणाचीं नव पुस्तकें खपुनियां आवृत्तिही वाढते
एखादें पण ' चोपडें ' निघुनियां अंगावरी शेकतें !
वाडें घेउनि काव्य-गायक कुठें गाण्यांप्रती धांवती
श्रोते मार्मिक ( ! ) काव्य-गान श्रवतां टीकेस आरंभती !
कोणा भूषविती अनेक कविता त्याच्यामुखीं गाउनी
एखाद्या ' रडक्या ' कवीस अगदीं देतात फेटाळुनी !
चाले भेद असा कवींत बहुधा प्रख्यात सारे जरी
एखादा घसरे तसाच चुकुनी येण्यापुढें यापरी !
पाही कोण अशा कवीस बुडत्या ?—जो तो असे आपला
देवा ! दे प्रतिभा कशी तरि तया, त्यासाठिं तो नाडला !!

† शाणोळीढ मण्याप्रमाणें पुण्याच्या शैक्षणिक वातावरणांत चमकूं लागणारे सुसंस्कृत पदवीधर 'अन्' शिक्षणशास्त्री यांनीं हा नवीन अर्थाचा शब्द ( भालाकारां-प्रमाणेंच ) मोठ्या प्रयत्नानें शोधून काढिला आहे !

प्रकाशन—विहार ( खास दिवाळी अंक )

ग्रंथालय ५३८९

# उंदीर पकडो !

जाति— केशवकरणी

## ( १ ) इतिहास

महाराष्ट्र देशांतुनि साऱ्या पुंडाई माजली
भयंकर वेळा ती पातली !
शिवरायानें मावळभाई हाताशीं घेउनी
टाकिलें यवनांना त्रासुनी !
अंकित करुनी अनेक किल्ले वाई प्रांतांतले
यशाचें तोरण फडकाविलें !
विजापूरच्या बादशहाला कळतां ही बातमी
जाय तो खवळोनी ना कमी !
'शिवाजिला जो धरून आणिल इनाम त्या देइन'
शहा तो सांगे फर्मावुन !
अफझूलखान तो सिद्ध तया जाहला
'उंदीर गिरींतिलं' शिवाजिला बोलला !
जातांच धराया प्रसंग ओढावला !
वाघनखानें उदर तयाचें शिवाजिनें फाडुनी
दिलें त्या स्वर्लोकीं धाडुनी !!

## ( २ ) वर्तमान

पुण्य पत्तनीं कहर प्लेगचा आज तसा जाहला
धुमाकुळ चहूंकडे माजला !
जिकडे तिकडे उंदिर पडुनी सांथ सुरू जाहली
तियेला लोकहि पडले बळी !
'नगर-पालिका' सर्व जनांना टोंचुनि देई तरी
सांथ ती हटली ना लौकरी !
सांथ सुरू जी उंदिर करिती- त्यांची संहारणा-
कराया, झाली मग योजना !
' आरोग्याच्या अधिकाऱ्या 'नें† जाहिरात काढुनी
दिलें कीं लोकांना सांगुनी-
" प्रत्येकीं उंदरास आम्ही देऊं बारा पया
धरोनी आणिल जो जो तया ! "
जाहला अधाशी कुणी तया तत्पर
उंदीर धराया होउनि बहु आतुर
सन्नीध जों न तो गेला त्याच्या तर
दंश विषारी घडुनि विचारा पोरांबाळांतुन
अरेरे ! गेला जग सोडुन ! !

†पुणें म्युनिसिपालिटीचे हेल्थ ऑफिसर ! प्लेगसमयीं त्यांनीं काढिलेली जाहिरात- ' धरून आणलेल्या प्रत्येक उंदरास ( सबंध ) एक आणा बक्षीस ! '

प्रकाशन- विहार

## भिक्षुकांस निमंत्रण

वृत्त — भुजंगप्रयात

( स्थळ-जोगेश्वरीनाका. भूमिका-बकंभट उपाध्ये )

चला भिक्षुकांनो ! अतां ह्या घडीला
उपाध्ये पहा बोलवीती तुम्हांला
चला शांतवायास ती पोट-खाई
तिथें दाखवा थाट तो पेशवाई !

चला घेउनी सर्व चंबू-गवाळें
नका सोडुं वा बायका आणि बाळें
सदा अक्षदा द्या स्वतःच्या घरांस
असे फर्मवीती उपाध्ये तुम्हांस

म्हणा कांहिंही मंत्र तोंडांमधून
कुळांला परी खूष ठेवा वरून !
परब्रह्म तें अन्न खाऊन खास
मुखें देत जा कर्पटी ढेकरांस !

पुरे वल्गना ! पाय जोरांत हाणा
तुम्हां आज जाणें अती लांब जाणा !
नका उन्ह मानूं– चला सर्व थेट
तुम्हांवीण जत्रेमधें शुक्शुकाट !

कसा आपुल्या कंबरा, – वेळ झाला
चला सोंवळें घ्या पळी आणि पेला !
कुणी दर्भ, पोथी कुणी पंचगव्य

चला घेउनी, साधण्या हव्यकव्य !
निघा सत्वरीं – मोहळीं जेविं माशा
चला ! वेळ झाला – धरा पंक्ति खाशा !
बसा जेवणासी, रडा श्लोक, गाणें
विडा दक्षिणा मात्र 'खोवून' येणें !
चला भिक्षुकांनो ! अतां ह्या घडीला
उपाध्याय हे बोलवीती तुम्हांला
चला शांतवायास ती पोट-खाई
तिथें दाखवा थाट तो पेशवाई !

प्रकाशन— विविधवृत्त

## गुंफलेली माळ

जाति– प्रणयप्रभा

हृदयिंचा हरपला लाल जरी
ही माळ कुणाला घालुं तरी ? ॥ ध्रु० ॥

वसंतसमयीं बाग फुलांची
परसांमधली फुलली माझी
फुलें तयांतिल तोडुनि ताजीं
गुंफिली माळ मीं चुकुन खरी !

अल्लड असतांना मी बाला
विवाह मंगल जों नच झाला
वैधव्याचा तों ये घाला
स्थिति करुणास्पद माझी सारी !

कपाळ माझें हें फुटलेलें
सौख्य न मजला देई कसलें
वेडें मन प्रेमास भुकेलें
जगरूढि परंतू घात करी !

निष्ठुर काळाचा हा कावा
सासुरवासें विटलें जीवा
बोल किती तुज लावूं दैवा ?
निशिदिनीं झुरत मी लाचारी !

पुष्पमाळ ही गुंफियलेली
सुकुनी होइल जगावेगळी
हाय ! परंतू तिज ना वाली
झोंपला प्रभू का गिरिधारी ?

प्रकाशन— संजीवनी

## कोण हे आई ?

वृत्त — दिंडी

श्री. आनंदराव टेकाडे यांची 'कोण हें आई' ही कविता ज्यांनीं वाचली असेल त्यांना या कवितेंतील रहस्य अधिक कळून येईल.

कण्हत कुंथत किति मंद चालतात
मुखावाटे आणिं शब्द तुमटतात
मान बगळी लुकलुके सर्वदाही
सांग मजला हे कोण तरी आई ?

सदा वदनीं औदास्य पसरलेलें
सोंग रोग्याचें काय हेंच आलें ?
रडे केव्हां वा विव्हळे कधींही
सांग मजला हे कोण तरी आई ?

केंस डोक्याचे शुभ्र एकजात
तोंड तैसें बोळकें नसुनि दांत
पडुनि खांचा डोळ्यांस दिसत नाहीं
सांग मजला हे कोण तरी आई ?

पान पिकलेलें खरोखरी भासे
कळत नाहीं कधिं गळुनि पडायाचें
बघुनि जो तो हांसून ह्यांस येई
सांग मजला हे कोण तरी आई ?

जरी साठी उलटून पार जाई
तरि न त्याचें मानून मुळीं कांहीं
झोंक तरुणाचा काय म्हणुनि दावी
सांग मजला हें कोण तरी आई ?

घरिं न कोणी स्वैंपाक करायाला
त्रास म्हणुनी देण्यास आपणांला
अगांतुक हा पाहुणा काय येई ?
सांग मजला हे कोण तरी आई ?

झोंप जेव्हां लागे न ती अम्हांला
म्हणत होतिस ना–' पहा बुवा आला ! '
तुझ्या हांके कां दैत्य तोच येई
सांग मजला हे कोण तरी आई ?

शब्द ऐसे ऐकून बालिकेचे
दीन मातेला बोलवे न वाचे !
जवळ ओढुनि तिज कळविलें खुणेनें–
" तुला येतीं वरण्यास हे खुषीनें ! "

प्रकाशन–मुलांचें मासिक

स्थानक ग्रंथ
सं. ३/५ ११२८

जाति—उद्धव

## फुलबाग

हें काय दिसे नयनांला— ‘ फुलबाग फुलांनीं फुलला’ !॥ध्रु०॥

ऋतु वसंत येतां विलसे बहरुनी कसा हा बाग !
नखशिखांत नटुनी थटुनी झळके जणुं जागोजाग !
पाहतां ह्यास मज वाटे कीं नंदनवनिंचा भाग !

तो शोभा स्वर्लोकाची
नवलाची — नवतेजाची
अवतरे इथें जणुं साची

भुलवाया भू-लोकाला— ‘ फुलबाग फुलांनीं फुलला ’ !

आम्रवृक्ष अतिशय उंच वाढुनी, विहरती येथें
पानें तीं त्यांचीं कवळीं वायुशीं हंसति आनंदें
मोहराचा पीत फुलोरा डोलतोच त्यांच्या नादें

हे वृक्ष परस्परांना
वायूसह डुलवुनि माना
भेटतां; घेत जणुं ताना

रमवाया रसिक जनांला— ‘ फुलबाग फुलांनीं फुलला ’ !

तीं तशीं सुरूंचीं झाडें कां गगनीं गिरक्या घेती ?
चाफ्यांचीं गंधित झाडें चहुंफेर नृत्य कां करिती ?
तीं पिवळीं त्यांचीं पुष्पें खदखदा फुलुनि कां हंसती ?

गंध तो तयांचा थोर
आनंदित अपरंपार
पसरला सर्व अनिवार

गंधोदधि हा जणुं फुटला— ‘ फुलबाग फुलांनीं फुलला ’ !

हा गुलाब खुलतो गोड  कोवळ्या कळ्यांनीं खास
तो दुसरा मोहुनि टाकी  फेंकुनी फुलांचा वास
हीं फुलें नव्हत तीं रत्नें  चमकतात चहुंबाजूंस

सृष्टीच्या सौंदर्याचा
हा खुलाच खजिना साचा
पाहरा खडा कांट्यांचा

सुचवितोच ह्या अर्थाला—  'फुलबाग फुलांनीं फुलला'!

संध्येच्या समयीं सारीं  सूर्यकांत सुमनें सजुनी
पश्चिमेस पूर्णानंद  कां स्व-मुखें आणि फिरवोनी
होणाऱ्या अस्त रवीला  देखतात डोकावोनी?

हीं सोज्वल सारीं सुमनें
नटुनि आज नवभारानें
संचरती स्वच्छंदानें

किरणांसह करुनी लीला—  'फुलबाग फुलांनीं फुलला'!

वेली त्या जाइ-जुईच्या  बहरुनियां बागेभंवतीं
एकमेक प्रेमरसानें  कवळुनि कां क्रीडा करती?
कां लता तयांच्या तान्ह्या  मन्‌मुराद झोके घेती?

कोवळ्या कळ्या रुसलेल्या
उमलल्या भल्या त्या सगळ्या
खेळल्या खुल्या नी गळल्या—

चहुंकडे सर्व भूमीला—  'फुलबाग फुलांनीं फुलला'!

कां भृंग भटकती येथें  प्रत्येक फुलावर फार?
नाचती नाच कां नाना  मारीत भराऱ्या स्वैर?
सेविती मधुर मधु तैसे  गाउनि कां वारंवार?

तें गाणें गुण्‌गुण् त्यांचें
जीवाच्या प्रेमरसाचें
स्फूर्तीचें – स्वानंदाचें

बोलतेंच ह्या बोलाला—  'फुलबाग फुलांनीं फुलला'!

कां चिमण्या झाडांवरती कोटरीं बांधुनी वसती ?
कां भक्ष्य शोधण्यासाठीं शुक, साळुंकीही फिरती ?
चंडोलहि गाणें गाती पांखरेंहि कां गुणगुणती ?

किल्‌किलाट् कोकिळ करती
किरकिराट् कीटक करती
काव ! काव ! काकहि करती

कीं कारण एकच सकलां— ' फुलबाग फुलांनीं फुलला ' !
शोभतें मधोमध कैसें हें सुंदरसें कारंजें ?
जल-तुषार नामें मोत्यांचे उडताती त्यांतुनि खासे
रंगही त्यांत किरणांचे लखलखती लावण्याचे

ह्या कारंजाच्या वरुनी
पांखरें भिराभिरा फिरुनी
प्रेमानें पाणी पिउनी

गातात ह्याच गानाला— ' फुलबाग फुलांनीं फुलला ' !
कां धेनू बागेजवळी संध्येच्या समयीं जमुनी
विहरतात वत्सांसंगें स्तनपान सुखें त्यां करुनी
वत्सेंही दुडदुड त्यांचीं खेळतात गोजिरवाणीं

ही येथिल शोभा बघुनी
धेनु, वत्स जाती रमुनी
म्हणुनि ते मोठमोठ्यांनीं

हंबरती ह्याच सुराला— ' फुलबाग फुलांनीं फुलला ' !
नाचतात बागेमध्यें पांखरें जशीं प्रेमानें
कां मुलें तशीं बागडती ऐक्यानें—आनंदानें ?
जशिं प्रफुल्ल हंसती पुष्पें तशिं मुलेंहि स्वच्छंदानें

हा मुला-फुलांचा बाग
फुललेला जागोजाग
ऐक्याचा गंध सुरंग

दरवळला दाहि दिशांला— ' फुलबाग फुलांनीं फुलला ' !

* * *

स्वर्गांची सुंदर शोभा        येथेंच आज मज भासे
कां सृष्टि-सुंदरी येथें        मोह्वी मुदें मन माझें ?
पांखरें फुलेंही पक्षी        लाविती वेड मज कैसें !

ह्या वसंतऋतुसमयाला
हा बाग तुम्ही बघण्याला
कधिं चुकूनहि जरि फिरलां

देखाल ह्याच दृष्याला—        ' फुलबाग फुलांनीं फुलला ' !

प्रकाशन—फर्ग्युसन कॉलेज मॅगझीन १९२९; विविधज्ञानविस्तार

## – गाजराची पुंगी

वृत्त—शार्दूलविक्रीडित

चाले गोंधळ नित्य काय कसला श्रीशारदामंदिरीं
जावें जेविं तदा तिथें झडतसे आवाज कांहीं तरी !
फुंकी ' शिंग ' कुणी सुरू न अगदीं झाली ' तुतारी ' कुठें
देई थाप ' डफावरी ' बडविलें कोणीं न जों ' चौघडे ' !

शाहीरी सरतां सुरेल ' मुरली ' कोणी तरी वाजवी
' पांवा ' ऐकुनि ' बांसरी-सनइ 'ला हाताळताती कवी !
' सारंगी 'स्तव भांडतो ' तुणतुणें ' घेऊनि तो ' गोंधळी '
कोणी शाहिर ' बँडवादन ' करी काढून वृत्तें खुळीं !

पोराचा कुणि वाजवीत बसतो ' घुंघूरवाळा ' कुठें
त्याचें पाहुनि तें–कुणी ' खुळखुळा ' घेतोच हातामधें !
काढी ' बोल पिपाणि'चे रडुनियां काव्यांत कोणी तरी
त्याला साथ करावयास दुसरा हातीं ' नगारा ' धरी !

कोणी घालित ' शीळ ' ती फिरतसे काव्यांत वेड्यापरी
बाधा भूतमयी जडून ' कवडा ' त्या ' गर्जना ' नांवरी !
जो जो तो उठतो ' विलाप ' करितो–मेलें न कुत्रें जरी
' बोंबाबोंब ' तशी–जरी न शिमगा काव्यांत कोणी करी !

वेड्यांचा असला जिथें भरुनियां बाजार गेला असे
मी आतां करुं काय स्वस्थ बसुनी? हो चित्त वेडेंपिसें!
त्यांनीं त्यांत 'विडी' तशी 'चिलिम' ना फुंकावया ठेविली
काढूं साधन कोणतें हुडकुनी ?– मत्स्फूर्ति चेकाळली!
वृत्ती गाजरपारखी करुनियां त्यांच्यामधें नंतर
जादूच्या पिशवींतुनी नविन मी हें काढितो 'गाजर'!
'पुंगी' वाजवितों अतां बनवुनी त्याचीच काव्यांतुन
नाहीं ती जर वाजली तडक मी खाऊनियां टाकिन!!

† एका प्रसिद्ध कवीच्या लौकरच (?) प्रसिद्ध होणाऱ्या 'गाजरांची पुंगी' ह्या कवितासंग्रहाचा माझ्या कवितेशीं अर्थाअर्थी कसला काडीचाही संबंध नाहीं–हें आधींच येथें सांगून ठवलेलें बरें! नाहीं तर एखादा पुणेरी 'सत्यवादी' (!) मलाही 'बाताराम' म्हणायचा!!

प्रकाशन—विविधवृत्त-(खास अंक)

चाल—आशिर्वाद

# ध्यास

तव पायीं जिव हा वेडा बघ होई प्राणनाथ ! ॥ ध्रु० ॥

भटकतां कुठें एकांतीं
भुलशी मम देखुनि कांती
मोहिलें नजर भिडवोनी तूं मजला त्या क्षणांत !
प्रीतीची पहिली दृष्टी
उभविते जादुची सृष्टी
निमिषांत करोनी टाकी मम हृदया आत्मसात !
जीव शीव व्हाया एक
प्रीतीचे मार्ग अनेक
उभयतां वरुनि स्वच्छंदें सांपडलों बंधनांत !
संसार जुटीचा गोल
चालविला कांटेतोल
आनंद स्वर्गीचा देई त्यामधुनी गोड साथ !
साम्राज्य वैभवा चढलें
परि काळा नच आवडलें
तो भोग पूर्वकर्मांचा विष टाकी अमृतांत !
नैराश्यकडा कोसळला
ह्या अभागिनीवर पडला
लागोनि तुला गुणवंता ! एकाकीं दुष्ट नाद !

संपदा लयाला गेली
आपदा छळाया ठेली
होणार चुके नच केव्हां जें लिहिलें प्राक्तनांत !
एकदां दिल्या वचनांसी
त्यजुनी तूं जाशी मजसी
कां रीत उलट प्रीतीची वावरते ह्या जगांत ?
कां करिशी हृदय कठोर ?
लावुनी जिवा मम घोर
जाहल्या कळ्या आशेच्या विरहानें भस्मसात !
झुरझुरुनी माझा प्राण
तुजसाठीं हो हैराण
ही रात्र तुझ्याविण चंद्रा ! बघ झाली रे अनाथ !
जरि कलंक चंद्रा आहे
चंद्रिका सदा तो साहे
जी जडे एकदां प्रीती ना तिजला घातपात !
तूं येशि न जरि भेटाया
'सुखरूप' तुला ऐकाया
सारखा 'ध्यास' हा लागे उरलेल्या जीवनांत !

प्रकाशन—विविधज्ञानविस्तार; ज्ञानप्रकाश

आ.क्र. ११२८

## स्मशानांतील डोंब

जाति-कोकिळा

हा डोंब खरा सरदार ! ॥ ध्रु० ॥

स्मशानभूमीवरी तयाचा
ताबा चाले पिढीजादचा
सुखवस्तू हा तेथिल राजा
प्रशांत, भीषण स्थानीं त्याचें सुंदरसें घरदार !
दिवस असो वा रात्र असो ती
क्षणभर ह्यातें ना विश्रांती
निमग्न कामीं-पोटासाठीं
स्वार्थासंगें परमार्थहि तो साधी अपरंपार !
बेडरलेली त्याची वृत्ती
मनास शिवते कधीं न भीती
दगडाहुनि ती कठीण छाती
भुतें खेंचरें जरी सभोंतीं त्यांची ना दरकार !
प्रेतें येती दहनविधीला
स्वागत त्यांचें करावयाला
देवानें हा दूत धाडिला
मनांत त्याच्या-' रंक राव हा '-कधीं न हीन विचार !

भयाण काळोख्या अपरात्रीं
स्मशानस्थानीं भीती भारी
अशा प्रसंगीं सहाय्यकारी
धांवुनि येतो-शूद्र नव्हे हा-देवाचा अवतार!
कमेटिचा नसतांना पास
स्मशान-नाट्यगृहांत खास
जाउं न कसल्या दे प्रेतांस
पांच वयांतिल मृत पोरांही करील तो प्रतिकार!
पासांसोबत त्यांस दक्षिणा
द्यावी लागे प्रत्येकांना
मान तयाचा राखियला ना
पुरा न होतो प्रेताचा त्या दहनविधीसंस्कार!
घरबसल्या हा प्रतिदिवसाला
करी कमाई ताळ न तिजला
लाजवील तो तुम्हां-अम्हांला
कनिष्ठ धंदा असुनि तयांवर लक्ष्मी हो दिल्दार!
जगांत ह्याची ख्याती मोठी
कथा पुराणांतिल ना खोटी
ह्याचेपाशीं नोकरिसाठीं
हरिश्चंद्र तो राजा राही होउनियां लाचार!
डोंबाची जरि महती गातो
हेवा त्याचा मला वाटतो
अंतर्यामीं मी तडफडतों
मला नोकरी देइल हा का?-जगतों मी बेकार!!

प्रकाशन— विहार

## तेव्हां आणि आतां

वृत्त— शार्दूलविक्रीडित


बाले ! आपण खेळलों उभयतां बाल्यामधें जेधवां
सत्प्रेम तुझें अलोट बघुनी आनंद झाला जिवा !
माझ्यावांचुनि ना तुला करमलें दारीं घरीं वा कुठें
तूझ्या सान्निध राहुनी धरियलें मी ना कधीं वांकडें !

उद्यानीं फिरलों प्रभातसमयीं नाना फुलें वेंचत
गेलों घालुनियां करांत करही त्या पाठशालेप्रत !
दोघां पाहुनि एकमेक, अपुले आप्तेष्टही तोषले
आशीर्वाद तयांकडून शुभ ते कित्येकदां लाभले !

बाल्याचा रमणीय काल सरुनी येई अतां यौवन
दोघांच्या चरितांतुनी कसकशीं स्थित्यंतरें होउन ?
नाहीं भेट तुझी–तशी मम तुला पूर्वींपरी जाहली
शेजारीं नित राहुनी वद कुणा ही रीत गे शोभली ?

दृष्टादृष्ट कधीं चुकून घडतां तूं कां बरें लाजशी ?
गालीं हांसत मात्र तूं खुणवुनी भाषा मुकी बोलशी !
त्याचा अर्थ जरी मुखांतुनि तुझ्या ना स्पष्ट संभावला
केव्हांपासुनि अंतरांत बघ मी हेरून तो ठेविला !!

प्रकाशन–सत्यवादी



## पंढरिचा वारकरी

जाति— बालानन्द

वारकरी मी वारकरी— पंढरिचा मी वारकरी ! ॥ ध्रु०॥
यात्रा भरते दरवर्षी पैसा होउनि बहु खर्ची
सान थोर पोरें बहुत गांवगांवचे येतात
पंढरि पोरांची असली मॅट्रिकविण दुसरी कसली ?

दरवर्षातें
जत्रा भरते
गर्दी होते

त्यांत न चुकतों खरोखरी— पंढरिचा मी वारकरी !
बसुनि सातव्या वर्गात वर्षें झालीं मज सात
अभ्यासाचा ये वीट सुचे न कांहीं मज नीट
मित्र पळाले मजपुढती दगड न हालें मी अगदीं
पास जाहल्याविण कसला तरणोपाय न तो मजला

लाज त्यजून
अभ्यासून
पुन्हां फिरून—

उरकुनि घेतों 'प्रिलिमिनरी'— पंढरिचा मी वारकरी !

'फॉर्म' मिळाया त्यांत पुन्हां
हेड्मास्तरच्या पोराला
गुप्त काहिंशी कामगिरी
काम नेमकें तो करितो

युक्त्या करितों मी नाना
करून घेतों मी ' अपुला ' !
त्यावर सोंपवितों सारी
पास कसा तरि मी होतों

पुढें मात्र ती
पडते भ्रांती !
लागुनि गळती

येतों पहिल्या पदावरी—
पंढरिचा मी वारकरी !

प्रयत्न जैसा कोळयाचा
रॉबर्ट ब्रूसचा धैर्यपणा
' पप्पू-बानर्जी- कीज् '
होते परि मम मंद मती

फिरून चाले मम तैसा
अंगामध्यें येइ पुन्हां
त्यांचा करितों मी कीस
गणीत विषयाच्यावरती !

विषय एक तो
अखेर नडतो
मग मी रडतों—

' ये रं माझ्या मागल्या तरी '—
पंढरिचा मी वारकरी !

'जोगेश्वरीला' मी गेलों
'जंग्ली महाराजांलाही'
पुन्हां तयारी जोरांत
विषय एक तो गणिताचा

नवस करूनी मग आलों
बोलुन गेलों मी 'कांहीं' !
चाले माझी एकांत ।
पास अतां मज होण्याचा

गेला हत्ती
उरे शेंपटी
अतां न भीती

नरकांतुनि निघण्यास वरी—
पंढरिचा मी वारकरी !

नशीब आपोआप फिरे
नवल घडूनी येइ खरें
शिकावयाच्या शाळेंत
शिक्षक झालों वाशिल्यांत
दवात फिटली जीवाची
नोकरि लाभे कायमची
'प्रिलिमिनरी'ला नच बसतां
' फॉर्म ' मिळाला मज आतां !

संकट असलें
जरि तें टळलें
मोठें पुढलें !—

नष्ट कराया यत्न करीं—
पंढरिचा मी वारकरी !

अखेर युक्ती मज सुचली
बुद्धी कोठुनि ती झाली ?
केंद्र पुण्याचें पालटलें
प्रयाण परगांवीं केलें !
ओळखण्याला तेथ कुणी
मला न, ऐसें पाहोनी
हुषार माझ्या मित्राला
बैसविलें मीं परिक्षेला !

निकाल झाला
विजय मिळाला !
तरि मी अपुला—

मनांत म्हणतों परोपरी—
'पंढरिचा मी वारकरी' ! !

प्रकाशन—साप्ताहिक सकाळ

## स्मृति-गीत

जाति—चंद्रकांत

आठवतो तुज कविते ! का तो काळ फजीतीचा ?
बाळपणाचा, अज्ञानाचा, ' नक्कल ' करण्याचा !
काव्यांगाचें ज्ञान चोरटें, चोरटाच जीव
कळलें नव्हतें काव्य काय तें ? स्फूर्ती निर्जीव !

छापित नव्हते संपादक कुणि, कविता बालांच्या
' कचरा ' म्हणुनी टाकित होते भक्ष्यीं कालाच्या !
हंसति परोपरि कोमळ हृदया त्यांतुनही टीका
गेले ते दिन ! कविते ! यापरि देउनियां ठपका !

बाळपणींच्या कविता सगळ्या स्फुरति आज फिरुनी
मासिकपत्रांमधें तयांची गर्दी छापूनी !
तूं कविता ती, तोच कवी मी, निंदकही तेच
परि होणारी टीका आतां डंसते ना खास !

कशास आतां असे निराशा ? झालें तें गेलें
' बनला ' कवि तो दाद न देई कुणी जरी भुकले !

प्रकाशन—विविधवृत्त

## पाय घसरला म्हणून— वृत्त—दिंडी

( भूमिका–कविरत्न श्री. घालघेंडे, आयुर्वेदविशारद् )

काव्य-गायन करण्यास परिषदेंत
कवी कोणी जाहला निमंत्रीत !
गळा सुस्वर नव्हताच जरी त्याला
नांव होण्या तो छपापून गेला !

निघायाची तो चालवी तयारी
नटायाची त्याजला हौस भारी !
स्वरूप सुंदर लाभे न मुळीं कांहीं
म्हणुनि दैवा तो दोष मनीं देई !

कृष्णवदनाचा रंग झांकण्याला
तयें लावियला दिखाऊ ' मसाला ' !
केंस उलटे फिरवून भांग काढी
साफ त्यांतुनि घोटली आज दाढी !

परिटघडिचा पोषाख जरीकांठी
सजे घालुनि शाहीर तो मऱ्हाठी
बूट पायीं चढवोनियां नवीन
विडी फुंकित तो निघे घरांतून !

घराबाहिर पाऊल ठेविलें न
तोंच मार्गी मार्जार ये दिसून !
चिडुनि त्याला तो कांहिं मारणार
घडुनि आला परि एक चमत्कार !

‘ वाड ’ हातांतिल जों न उगारीलें
तोंच मांजर त्याजला आड गेलें !
अशुभ घडतां थांबून तो न गेला
म्हणुनि त्याच्या ये काय प्रचीतीला ?

मांजरानें बैसून ‘ कळस ’ केला
त्याच जागेला घोर घात झाला !
पाय कविचा घसरून तेथ पार
त्यास घडला साष्टांग नमस्कार !

## अनुष्टुप्

सत्य ही गोष्ट तूं रसिका ! असे ना अर्थ त्या जरी
मुलांना रेडियोंतूनी नको ती ऐकवूं परी !

प्रकाशन--विद्याविलास

## विरह-गीत

चाल—महाराष्ट्र-गीत

बघुं नकोस अंत अती धांव मोहना
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना ॥ ध्रु० ॥

इष्ट-भेट प्रथम येइ घडुनि जेधवां
साधिलास डाव पुरा झुलवुनी जिवा
वचनबद्ध करुनि, देशि तूं इमान ना ?
आतुर मी होइं तुझ्या प्रेम दर्शना !

ज्योतीला ज्योत जडुनि जीव रंगला
सहवासें स्वर्ग तुझ्या तुच्छ भासला
चातक मी मेघ तूंच गमत जीवना
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

भरलें तव रूप सख्या ! हृदयमंदिरीं
नाहिं तुझ्यावीण जिवा सुचत क्षणभरी
प्रीतीची होय तुझी मजसि झडपणा
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

लावुनियां गोड भास मृगजळापरी
भुलविलेंस सांग कुठें जाउनी दुरी ?
जादुगार जादु करुनि दिसशि ना पुन्हां
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

दीपज्योतिवर पतंग घालितो उडी
मोहुनियां पायिं तिच्या अर्पितो कुडी
भ्रमर जाइ जातिवरी करुनि वंचना
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

मैनेसम झुरुनि झुरुनि दिवस यामिनी
लोटुनियां काढुं किती अश्रुंचे मणी ?
मायेविण नाहिं रडत कोणिही कुणा
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

येशिल तू भेटण्यास अजुनि वाटतें
घेउनियां ध्यास तुझा काळ कठितें
हरिणी मी दीन भ्रमुनि भटकतें वनां
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

येइं येइं भेट देइं हृदय-रंजना
पुष्पलता सुकुनि जाय जीवनाविना !
वरकांती प्रीति सोड, विरह साहिना
आतुर मी होइं तुझ्या प्रेम-दर्शना !

प्रकाशन—विविधज्ञानविस्तार; ज्ञानप्रकाश

# पैशासाठीं

चाल—फटका

कै. रेंदाळकरांसारखे कित्येक कवि 'प्रेमासाठीं' वेडे होतात. हल्लींच्या काळांत बेकार झालेला एखादा सुशिक्षित तरुण 'पैशासाठीं' पिसाट बनून गेल्यास आश्चर्य मानण्याचें कारण तें काय?—आणि जगांत पैसा व प्रेम ( कनक आणि कांता ) यांचें वेड कोणास नाहीं?

( भूमिका— बेकार, बी. ए. )

पैशासाठीं पिसाट झालों मिळेल कैसें पोटाला ?
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला ! ॥ ध्रु० ॥
वणवण फिरलों गांवोगांवीं 'फर्म, ऑफिसें' धुंडियलीं
'व्हेकन्सी'च्या नकारघण्टें नष्ट सकल ही तनु झाली !
चक्कर नशिबाची फिरली
वृत्ती आनंदित सरली
नव्हतीं व्यसनें तीं जडलीं
शून्य सर्व हें जीवित भासे, कठिण वेळ मध्यान्हाला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !—
पोपटपंची शिक्षण सारें खर्चुनि पैसा ज्ञान खुळें
पदव्या मोठ्या लक्षणिं खोट्या, जीवाला नच ध्येय कळे !
विपरीता झाली सृष्टी
बेकारीची हो वृष्टी !
सुशिक्षित ( ! ) मी बहु कष्टी
नोकरि बघतों, धंदा बघतों, वशिला कोठें नच भिडला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

वय बहु झालें, लग्नहि दुर्लभ, मिळे कोठुनी मज कांता ?
' घरजांवई ' वा ' दत्तक ' कोणी घेइल त्या मी सिद्ध सदा !
मुग्ध-विरह परि हृदय चिरे !
पैशावरती विश्व फिरे
मिळेल तो मज कसा बरें ?
चैन पडेना, बघुनि पत्रिका, भविष्य; व्रत सांगा मजला
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो ! कोणी काम मला !

आप्त सोयरे कोण कुणाचे ? मित्रहि शत्रू ते बनती
'शितेंच नसतां भुतें कोठली' ? संकटकाळीं मूढ मती !
पैसा करि अन्नान्न दशा
उडविल धनिकांचा फडशा
करील तो ती पूर्वदिशा
त्याच्यासाठीं भिक्षा मागूं ? अथवा बनुं का चोर भला ?
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

काय करावा उपाय सांगा, जीवहि द्यावा हाय गमे !
विचार करुनी मस्तक फिरलें, परतंत्रीं जगणें न जमे !
देवाघरचा न्याय बघा
कुत्रें भरतें पोट न का ?
मीच रहावा काय भुका !
हळहळ वाटे;—' स्थिती न ऐशी येवो कधिंही कोणाला ! '
उडुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी काम मला !

प्रकाशन—विविधवृत्त

## शेवटची आशा

वृत्त—शार्दूलविक्रीडित

जेव्हां टाकुनि तूं मला प्रियकरा ! गेलास देशांतरीं—
झाली दुर्धर मत्स्थिती धजत ना वर्णावया वैखरी !
मासोळी कुढते जळाविन जशी प्राणांप्रती अर्पुनी
आली ती विरहानलें मज दशा दैवावरी ओढुनी !

गेल्यापासुनि तूं प्रतिक्षण मला वर्षांपरी भासला
तैसा ध्यास तुझा निरंतर हृदीं लागोनियां राहिला !
झालें वर्ष पुरें; तुझी परतण्या वेळा जरी पातली
ना त्वद्दर्शनलाभ होत म्हणुनी, माझी मती कुंठली !

नाहीं पत्र तसें तुझें अलिकडे मी रोज त्या वांछितें
रात्रींच्या समयीं तुला स्मरुनियां ही चातकी स्फुंदते !
आपोआप झडे जशी कुमुदिनी चंद्रप्रभेवांचुनी
मीही अंथरुणावरी खिळियलें मृत्यूमुखीं ठेपुनी !

आशा शेवटची उरे–' झडकरी व्हावें तुझें दर्शन
घ्यावें आपण एकदां उभयतां आलिंगनीं चुंबन !
जातो प्राण हळूहळू तरि दिला डोळ्यांत मी ठेवुन
झालें ईप्सित पूर्ण मात्र म्हणजे तात्काळ तो सोडिन '!

प्रकाशन—सत्यवादी

# पुणेरी पगडी

जाति—**बालमुकुन्द**

कवि अज्ञातवासींचें ' माझें फूल ' हुंगूनच ह्या 'पुणेरी पगडी'चा स्वीकार करावा.

ही पगडि राहुं द्या डोक्यावरची अजून
कुणि उडवुं नका हां तिला ' पुणेरी ' म्हणून ! ॥ ध्रु० ॥
चाले न 'वकीली' पुण्यांत जरि राहुनी
वर्तमानपत्रीं घेतां तनु वाहुनी
बनलोंच पढारी पगडी मी घालुनी
पण कुणी म्हणेना दे. भ. खरा मज चुकून !
'गांधाळ'[1] लोक ते खादीवेषामधें
तत्त्व तें तयांचें मला मुळीं नावडे
मम पगडीवरती सदा फोडुनी खडे
अर्पिती मला ते खादी टोपी ' टिचून[2] ' !
निर्धार परंतू निश्चित माझा असे
मी पेशवाइच्या खुणेस राखीतसें
सामर्थ्य पगडिचें तुम्हांस सांगूं कसें ?
ती येइ फिरवितां-येतां संकट कुठून !
आहेर कितीही तुम्हीं मला अर्पिले
ते जतन करूनी ठेविन मी चांगले
नच पगडी टाकिन तुमच्या हेक्यामुळें
मी मेल्यावरती जाळा तिज कुरतडून !

( १ ) भोजनभाऊंच्या साहित्यपाकशाळेतील पिठल्यांत अचानक सांपडलेला हा शब्दाचा गोळा ! ( २ ) प्रतिभासाधनाच्या धुमश्चक्रींत धुळवड उडविणारा Bomb-shell.

प्रकाशन—विहार



ग्रंथालय ठाणे
५३६८

वृत्त—दिंडी

# करुण कहाणी

ऐन बाराचें ऊन कडक झालें
टोल बाराचे निनादून आले
परळ-गांवीं गिरणींत होइ भोंगा
भाकरीची ती वेळ मजुर लोकां !

काम हातांतिल टाकुनी तसेंच
मजुर गेले धांवून जेवण्यास !
भुकेनें हा व्याकूळ एक पोर
बघे गर्दीतुनि कुणा सभोंवार ?

बाप त्याचा गिरणींत कामगार
वृद्ध तरि तो कामा न ऐकणार !
आज त्याच्या जीवा न गोड कांहीं
कसें करुनी तो दिवस भरुनि नेई !

परी बाराची लाभतांच सुट्टी
ताप भरुनी तो होइ फार कष्टी !
काम आला सोडून निराशेनें
साउलीला टाकिलें अंग त्यानें !

कुणी पाहीना त्यास विचारोनी
गर्क जो तो आपुल्या विचारांनीं !
पोर त्याचा धुंडीत फिरे त्याला
व्यर्थ माया येईल का कुणाला ?

फार फिरला तो पोर जागजागीं
दिसुनि आला ना पिता त्यास मार्गी !
भूक त्याची हरपून घे उभारी
दोन प्रहराची वेळ कठिण भारी !

जीव त्याचा जरि थकुनि फार गेला
घरीं जाण्याला त्यांत तो निघाला
तोंच झाडाखालती त्यास कोणी
प्राण दुःखी एक ये आढळोनी !

जवळ जातां दिङ्मूढ पोर झाला
घाम त्याच्या अंगास सुटुनि आला !
मिठी त्यानें बापास मारियेली
आणि वाचा तोंडून ही निघाली !—

" काय बाबा, जाहलें हो तुम्हांला ?
उठा ! माझ्याशीं शब्द एक बोला !
तुम्हां केंव्हांपासून बघत आहें
आणि आतां पाहतों काय मी हें ? "

शब्द बाळाचे अमृतासमान
ऐकतां ना होणार खूष कोण ?
हृदय आलें उमकून त्या पित्याचें
बोल पडले बाहेर कळकळीचे—

" आज माझ्या जीवास चैन नाहीं
दिवस त्यांतुनि बुडवितां येत नाहीं !
पूर्ण खाडा होतांच आजचा हा
उद्यां कैसें ?— जांचतो प्रश्न जीवा !

दिवस अर्धा काढीन राहिलेला
पाठिराखा तो देव गरीबांला !
घरीं आतां जाऊन तूंच येई
स्वतः खाऊनी आण मला कांहीं !

वाट अपुली पाहात ' ती ' असेल
मी न येतां ' ती ' काळजी करील !
सांग समजावून तिला तेव्हां
आज माझ्या कीं नसे गोड जीवा ! "

वडीलांच्या घेऊन निरोपाला
पोर गेला धांवून स्वगृहाला !
तीन मजली ती चाळ मजूरांची
उभी माडीवर तेथ माय त्याची !

बाळ अपुला लाडका न्याहळून
हृदय आनंदें तिचें ये भरून !
" कां न ' त्यांचें ' जाहलें अजुनि येणें ? "
विचारी ती त्याजला कौतुकानें !

प्रश्न ऐसा श्रवतांच माउलीचा
कंठ आला दाटून बालकाचा !
अश्रु आले डोळ्यांत खळखळून
शब्द पडले अडखळत मुखांतून-

" आज बाबा येणार अतां नाहीं
नसे त्यांच्या जीवास गोड कांहीं
कसें करुनी हा दिवस लोटणार
सांजकाळीं ते घरीं परतणार !

घरीं मजला त्यांनींच जावयासी
धाडियेलें आर्धीच जेवणासी
‘ आणि येतांना ’ असें बोलले ते—
‘ आण कांहीं तूं मला खावयातें ’ !

भाकरी तूं बांधून अतां देई
मीहि तेथें खाईन आज आई !
मला खाणें जाईल कसें येथें ?
घरीं बाबा ना आज जेवण्यातें ! ”

पितृप्रेमाचे बोल बालकाचे
हृदय टाकी भारून माउलीचें
तडक जाउन ती आंतल्या घरांत
येइ घेऊनी शिदोरी करांत !

शिदोरी ती जरी गरीबीची
खऱ्या कष्टाची पूर्ण आवडीची !
मुलाला ती देऊन वदे आई—
“ जपुनि आतां सत्वरीं बाळ जाई !

आणि ‘ त्यांच्या ’समवेत तूं बसून
टाक सारी भाकरी संपवून !
काम करुनी येशील तूंच जेव्हां
हात धरुनी ‘ त्यांनाच ’ आण तेव्हां ! ”

वडीलांचा घेऊनियां वशीला
बाळ होता गिरणींत लागलेला !
वेळ सुट्टीची सरत अतां येई
‘ बरें ! ’ आईला म्हणुनि धांव घेई !

दैव केव्हां कोपेल कुणा कांहीं
सांगतां तें जगतांत येत नाहीं !
गरीबांना गांज़तें दैव फार
सुखें खाऊं देई न घास चार !

बाळ जाण्याच्या ऐन धांदलींत
जिन्यावरुनी घसरला पाय थेट !
पार आला चौकांत कोसळून
हांक मारी 'आईस' ओरडून !

लोक आले धांवून सर्व खालीं
काय त्यांनीं पाहिलें त्याच वेळीं !
मेंदु फुटला तो पार मस्तकाचा
प्राण गेला सोडून बालकाचा !

चौकिं रक्ताचा सडा लाल झाला
दृश्य बघवेना तेथलें कुणाला !
भाकरी ती फडक्यांत बांधलेली
उडुनि तुकडे रक्तांत माखलेली !

बाप-लेकांच्या मुखांतील घास
गळुनि पडला होऊन असा ऱ्हास !
माय आली धांवून, घाबरून
आणि हंबरडा फोडिला; रडून !—

" कसा बाळा सोडून मला गेला ?
नव्या नवसाचा एक तूंच झाला !
तुझ्या आधीं मी कां न बरें मेलें ?
काय माझ्या हें कपाळीं लिहिलें ?

दुष्ट काळानें तुझ्या मुखांतून
अन्न कायम ना घेतलें हरून ?
हाय ! आतां मी कशाला जगावें ?
वृत्त 'त्यांना' हें कसें मीं कथावें ?"

अभागिनिचा तो शोक दुर्निवार
प्राणिमात्रांना कां न रडविणार ?
दगड धोंडे जातील दुभंगून
लता पुष्पेंही ढाळतिल गळून !

वृत्त कुणि हें बापास ऐकवीलें
आणि त्याचें काळीज चिरुन गेलें !
रडत धांपा टाकीत घरीं आला
भोंळ आली पाहून लेकराला !

चार चौघांनीं त्यास आंवरून
घरामध्यें ठेविलें झोंपवून !
बाळ नेला दहनविधीसाठीं
रडत डोकें आपुलें माय फोडी !

बाळ जाऊनी दिवस दोन तीन
नाहिं झाले तों काय ये घडून ?
बाप त्याचा जो खिळुनि बिछान्याला
खंत खाऊनी गतप्राण झाला !

पुत्र-शोकाची आग भडकलेली
जों न विझली तों काय हें कपाळीं !
वेड लागोनी हाय ती अभागी
फिरत असतांना दिसे परळ-भागीं !

प्रकाशन— सत्यवादी (मुंबई)

## उंच झालों म्हणून—

वृत्त-शार्दूलविक्रीडित

झालों उंच म्हणून मी मज किती तो त्रास होतो बरें ?
सांगू का समजावुनी पण कुणा वाटेल तें का खरें ?
आढ्याचे मम मस्तकास बसती दारांत ठोके सदा
गेलों वांकुनि मी तरी न टळतें ती दारुणा आपदा !
एरंडासम उंच पाहुनि मला माझ्या स्वतःच्या घरीं
जो जो तो उठतो निरर्थ मज घे राबून कैद्यापरी !
' काढा जिन्नस ते फळीवरुनियां ठेवून द्या नी पुन्हा '
ऐशा सक्त मजूरिनें रखडण्या केला जणूं मी गुन्हा !
बाजारीं मिळतें न रुंद मजला कोठें कधीं धोतर
जें जें नेसुनि पाहतां न पुरुनी तें येइ गुडघ्यावर !
जेव्हां मी बसतों पुढें कधिंकधीं नाट्यगृहाच्यामधें
माझेमागिल सर्व लोक चिडुनी देती बसूं ना सुखें !
तोटा आणिक भासतो हरघडी उंचीमुळें जो मला
सांगूं का अपमान सर्व गिळुनी ? हा जीव वैतागला !
लाभे स्त्री मज ठेंगणी तिजपुढें मी सारखा वांकुन-
झालों जर्जर त्यामुळें न रुचतें-' आलिंगुनी चुंबन ' !

* * *

देवा ! मृत्यु नको कशास्तव तरी बोलो कुणी बापुडें
देवा ! आयु नको तुला विनवितों होणें जरी उंच तें !!

प्रकाशन-वसुंधरा

# येऊं नको ग दडून !

जाति-केशवकरणी

स्थळ— एका कॉलेजांतील वसतिगृहाची पिछाडी.

भूमिका— तो— J. B. A.

ती— F. Y. Arts.

सायकल्वरती स्वार होउनी काळ्या रात्रीमधून्
राजसे ! येउं नको ग दडून् !
'अभ्यासाच्या मार्गदर्शिका' ह्यां स्वतःला म्हणून्
सुंदरी ! भेटुं नको ग अडून् !
प्रेमबंधनीं घेरुनि मातें जाशिल जर तूं निघून्
कसें ग होइल माझें फिरून् ?
मी वसतिगृहांतिल विद्यार्थी त्यांतुनी । ग
अपरात्रीं फिरण्या जाउं न देती कुणी । ग
बघण्यास निघालों नाटक मी चोरुनी । ग
तोंच कोठुनी चमकत आली मूर्ती तव हांसरी
बघोनी धालों मी अंतरीं !
चटक जिवाला लावुं नको ग सांगुं तुला मी किती ?
प्रीतिनें जाते चळुनी मती !
स्वरूपसुंदर रेखिव बांधा थबथबतें यौवन
पाहतां विरघळतें मन्मन !
अबला जरि तूं ठाव घेउनी माझ्या हृत्सागरीं
चोरिलें मौक्तिक प्रेमापरी !

राहतो मीन तो जैसा पाण्यावरी। ग
मज्जीव तसा हा तगेल तूझ्यावरी। ग
तव सानिध्यानें स्वर्गहि पृथ्वीवरी। ग
जा पण आतां-थांबु नको तूं एकहि क्षण यापुढें
वेळ ती सांगुनि येत न गडे!

उभी अजूनी सांग कशाला? जा ग झणीं साजणी
असे तो 'रेक्टर' असुचा 'मुनी'!
सवंगडी ते येतिल आतां-येथ तुला पाहुनी-
करतिल 'षष्ठी' माझी कुणी!
हेतु कांहिंसा धरुन आलिस जरि तूं माझ्याकडे
जिवाला पडलें मज सांकडें!
लाविलें वेड तूं पुरतें माझ्या मनां। ग
हें इंगित आतां कळेल बंधूजनां। ग
मी कुठवर सोसूं हृदयाच्या वेदना। ग
सहवासास्तव होशिल माझी जेव्हां तूं सहचरी
ध्यास हा पुरेल हृदयांतरीं!

प्रकाशन—सत्यवादी

## यशाचा मार्ग

जाति—**प्रणयप्रभा**

संकटें सदोदित मजपुढती
दिसणार यशाचा मार्ग कधीं ? ॥ ध्रु० ॥

यौवन माझें रसरसणारें
तडफेचें तें पिउनी वारें
जरि क्रांतीचे उडवि फवारे
कां बंधन पडतें त्यांवरती ?

अथांग दुथडी सरिता वाही
बंधारा तिज थोपुनि ठेवी
आकांक्षा मन्मनिंची तेवीं
पोंचते न पूर्णत्वा अगदीं !

वादळ दर्यावरती होतें
तारूं तेव्हां स्वैर भटकतें
मन्मन वेडें तैसें भ्रमतें
जर करील कोणी मज बंदी !

वृत्ती माझी स्वतंत्रतेची
कशास नाहीं डरावयाची
ब्याद् परंतु परतंत्र्याची
जाळतें जिवाला, त्या न मिती !

प्रसंग येतां दुर्घट भारी
आप्त, मित्र ना कुणी विचारी
गुरु शिष्यांसहि मानी वैरी
निष्ठूर जगाची कां नीती ?

नैराश्याचें हें रडगाणें
गाउं कशाला केविलवाणें ?
रमुनि स्व-कार्यीं; ध्येय गांठणें
प्रतिकूल असो मग दैवगती !

प्रकाशन—विद्याविलास

# ताल्या पंतोजी

वृत्त— शार्दूलविक्रीडित

आठ वर्षांच्या कोमल बालविधवेला पाहून एका प्रोफेसरसाहेबांच्या मनाला एकाएकीं चरका बसला ! आमच्या खेडेगांवांतील ताल्या पंतोजींनीं शाळा तपासण्यासाठीं आलेल्या एका अनपेक्षित व निष्ठुर अशा परीक्षकाला ( Inspector ) पाहतांच त्यांच्याही मनाला एकाएकीं भयंकर धक्का बसला ! सहृदय रसिकांनीं-'ह्या दोघांत कोणाच्या मनाला जास्त हिसका बसला'-याची आवश्यकता भासल्यास जरूर तो काथ्याकूट आपापल्या कंपूंत करावा !

होती वेळ दुपारची कडक ती कंटाळवाणी जिवा
होती बेफिकिरी मुलें मजपुढें अभ्यास तो घ्यावया !
त्यांच्या मथ्थड बुद्धिला पढवितां नाराज मी होउनी
गेलों विस्मरुनी तयां शिकविणें, झोपेमधे गुंगुनी !

गर्जें मी उठुनी मधेंच कितिदां–' शिस्तीमधें वागण्या '
अभ्यासावरुनी उडून मन घे त्यांचें परी खेळण्या
हत्ती जात असे मुकाट स्व-पथीं कुत्री जरी भुंकुन
तेवीं सान मुलांस नाकळुनियां मी चालवीं शिक्षण !

एकाकीं इतुक्यांत कोणि मजला बाहेर हांकारिलें
माझ्या स्वप्नसमाधिंतून मजला भानावरीं आणिलें !
गेलों बाहिर तो भयंकर अती धक्का मना बैसला
शाळेला बघण्या ' परीक्षक ' कुणी दैत्यापरी ठाकला !

शोभा तो करणार खास म्हणुनी, अंगीं भरे कांपरें
' एकाकीं अवलोकनें मन पहा होतें किती घाबरें ! '

प्रकाशन—विविधवृत्त



/

राग—**मालकंस**

# एका गरीबाचें मागणें

नको ह्या जगीं राहणें यापुढें तें
जिवा दुःख मोठें, नसे सौख्य कोठें !

मना जाळते रोज चिंता विषारी
कशी वेळ ती भागवावी दुपारीं ?

अहोरात्र हिंडून भिक्षा न हातीं
लुळा पांगळा मी सदा अर्धपोटीं !

पुरेसें कुठें वस्त्र अंगावरी ह्या ?
जरी ताप थंडी असे ताप द्याया !

जगीं एक मी; ना मला बाप, आई
मिळे प्रेमवात्सल्य ना सौख्यदायी !

दिसेना कुठें ना एक पैसा कसा तो
कशाला विचारावया मित्र येतो ?

जगाचा पुरा वीट आला जिवाला
कळेना असे जन्म माझा कशाला ?

स्वहातें महत्कार्य कांहीं घडेना
करी दुष्ट हा काल सर्वत्र दैना !

कसे स्वार्थधुंदींत श्रीमंत मेले ?
कुणी आज दीनांस वाली न ठेले !

न हातून त्यांच्या मिळे दान कांहीं
परंतू शिव्या खावया वेळ येई !

कशाला बरें दोष दैवास द्यावा
किती भोग हा नित्य भोगीत जावा ?
जिवापाड हे क्लेश शांती न जीवा
किती अंत तूं पाहसी सांग देवा ?

दयाळू तुला बोलती दीननाथा
कसा तूं मला होसि निष्ठूर आतां ?
तुवां ऐकिले बोल, जे भक्त त्यांचे
तुझा दास मी मागणें ऐक माझें !

नको वाढवूं आयुची रेघ माझी
पुरे जाहली जांचणी ह्या जगींची !
जिवाला न आशा कशाचीच राही
कधीं मृत्यु येईल मी वाट पाहीं !

टळेना जगीं मृत्यु कांहीं कुणाला
तसें टाळतां येत नाहीं तयाला !
म्हणोनी तुला मागणें हेंच देवा–
' मला दे क्षणीं मृत्युचा गोड ठेवा ! '

सदरहू कविता 'सत्यवादी' ता. २४-१-१९३४ च्या अंकांत प्रसिद्ध झाली होती. परंतु हीच कविता श्री. बाबू विठोबा पवार, जत, यांनीं ता. २०-४-१९३५ च्या 'विद्याविलासां'त 'दारिद्र्यनवमी' हा नवीन मथळा देऊन ती बहुतेक जशीच्या तशीच आपल्या नांवाखालीं दडपली होती. संभावित चोरांनीं आतां कविताही 'लंबे' करण्याचा कट केला आहे कीं काय ?

प्रकाशन–सत्यवादी

## अविवाहित राहिलों जर—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

दुर्दैवें जर यौवनांत पडलों मी मात्र लग्नाविना
पापी मार्ग मला चुकून धरण्या होईल ती वासना !
सान्निध्यांत जिच्या सदा हरपुनी जातील त्या जाचण्या
प्रीतीची मज लाभणार न कळी कोठें कधीं हुंगण्या !

दांपत्यें दिसती कितीक भंवतीं हीं स्वैर संचारती
लीला प्रेमळ ज्यांचिया बघुनि कां हापापते मन्मती ?
संसारीं सगळे सदोदित सुखी-दुःखांत मी एकला
इच्छेवांचुनि यौवनांत मज कां संन्यास ओढावला ?

सिंधूला सरिता, तरूस लतिका, मेघास विद्युल्लता
सूर्याला वसुधा, सुधांशुस निशा, देवासही देवता !
सृष्टीचीं युगुलें सुखें विहरती पाहून त्यां मी झुरें
नाहीं प्रीय सखी तरी रिझवुं मी कैसा जिवाला बरें ?

* * *

' देवा ! मृत्यु नको '-वदेल कुणिही-' संसारप्रेमामुळें '
' देवा आयु नको '-म्हणेन- ' मजला ह्या ब्रह्मचर्यांतलें ' ! !

प्रकाशन— विहार

## विवाहित झालों तर—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

देवाच्याच मनांत येउनि यदा, आली चतुर्भुजता
चित्तीं दुःख न वाटतें तिळभरी–सौख्यांत मी सर्वदा !
प्रेमा अर्पुनि प्रेम ती मम सखी ध्येयप्रदा नेइल
जेव्हां जाइल जीव हा दुखवुनी संजीवनी पाजिल !

ज्याचें लक्ष बळेंच जात पळुनी पापी कुमार्गाकडे
तें थांबेल अपाप पार झडुनी– सद्भाग्य हें केवढें ?
जे जे दुष्ट प्रकार होत जगतीं ह्या कामइच्छेमुळें
अन्यस्त्री–सुखभोग ह्यासम पुढें जातील ते चोचले !

अन्यस्त्री अपुल्या मनांत गणली ज्यानेंच मातेपरी
त्याला काय कमी ? समर्थ असतां लक्ष्मी प्रिया ती खरी !
लोकीं पाप जरी तिथें न मन हें ढुंकूनही पाहिना
सन्मार्गा सखि न्यावयास असतां माधुर्य ये जीवना !

* * *

दुःखें घालवितों–उमेद धरितों–संसार मी थाटतों
ती जी प्रीय सखी तिच्यासह सुखें स्वर्गांतली भोगतों !!

प्रकाशन— विहार

— स

चाल—सुरेख संगम किती

ह्या जगांत प्रेमाविना । सखे ग
मला न कांहीं दिसे ! ॥ ध्रु० ॥

हा पहा जलाचा झरा
वाहतो कसा झरझरा
निज प्रेम-गान उधळीत भेटण्या नदीस शोधीतसे !

ती नदी तशी गिरिंतुनी
धडधडा धांव घेउनी
मुरकून मारते मिठी सागरा–जडून कसलें पिसें ?

गिरि-शिखा किती उंचशा
अप्सरा महीच्या जशा
आलिंगन द्याया नभा चालल्या नटूनि किति राजसें !

भूवरी लता ही सदा
होतसे तरूवर फिदा
अन् नभांत विद्युल्लता–ढगांसह नृत्य करूनी हंसे !

पौर्णिमा-प्रभा पाहुनी
गर्जतो सिंधु उफळुनी
ये भरति कशाची ? हृदीं तयाच्या प्रेमभाव ना वसे ?

रविसवें खुले कमलिनी
विधुमुळें तशी कुमुदिनी
तो रंग गुलाबी असे कशाचा ? कोण कुणा देतसे ?

मालिका घनाची कुठें
नाभिं दिसूनि ये दृष्टिंतें
तरि मयूर नाचे प्रियासवें कां ? त्यजूनि सारें रुसें !

ती जशी शरच्चंद्रिका
दे प्रीति चकोरादिकां
ना मूर्त तुझी त्यांपरी मला ग–खेळ वृथा सृष्टिचे ! !

P. B. Shelley कवीच्या Love's Philosophy ह्या कवितेच्या आधारें.

प्रकाशन—काव्यरत्नावली

जाति—पादाकुलक

# आवाज

ओसाड अरण्यांत फेरफटका करीत असतां कवीला मधून मधून एक कसलासा बेसूर आवाज ऐकूं येई! हा आवाज कसा आला, कोठून आला आणि कोणाचा आला याचा त्यानें कानोसा घेत घेत जंग जंग पछाडलें; पण व्यर्थ! त्या फंदांत त्याच्या मनाची जी चलबिचल झाली तिचें खालील पद्य हें चित्र होय!

मुकाट रानीं हिंडत असतां
आवाज कर्कश कानीं पडला
निघुनी आला ध्वनि हा कोठें
धडपडलों जरि ठायीं ठायीं
कार्य आणि कारण ह्यांवरती
शंकित माझें तैसें हें मन
भयाणता जी वनांत नांदे
प्राणी येथें घुबडावांचुन
येइ न कोणी या जागेला
पूर्वीं जेथें लोक रहाती
भुताटकीचा सारा खेळ
साथ तयाला देण्यासाठीं
संतत करिती ते घूत्कार

श्रांत जीव हा रमण्याकरितां
अधीक जिव त्यायोगें विटला !
गूढ मला हें पडलें मोठें
परी सुगावा त्याचा नाहीं
वस्तुमात्र चाले ह्या जगतीं
उत्तर देई प्रश्नें काढुन !
दाविण्यास ती भीतिनादें
नाहीं कोणी वास करून !
कांहीं केल्या पुसावयाला
तेथें आतां धोंडे माती !
चाले येथें तिन्ही त्रिकाळ
अगांतुकानें घुबडें येतीं
त्यांचा हा का ध्वनी कठोर ?

* * *

मुग्धा बाला कुमारिका ती
सज्ज जाहली विवाहकाला

प्रवेश करुनि यौवनप्रांतीं
सुखवस्तू नवरा वरण्याला

व्यंगें अंगांतील परंतू
काय करावें कांहिं सुचेना
वयमर्यादा लोटुनि गेली
आईबापांपरी तियेला
कॉलेजांतिल एका तरुणा
परंतु तो कॉलेजकुमार
होउनि ऐशी प्रेमवंचना
झुरुनी झुरुनी झाली रोड
आयुष्याची झाली माती
यापरि कंटाळून जिवाला
डोक्यामध्यें येइ विचार
पुढें न मागें बघतां कांहीं
काभिन्न काळी दरी बघून
प्रतिध्वनी जो तेथें घुमटे

तडीस नेती तिचा न हेतू
पदरीं कुणाच्या तीच पडेना
गळयास कधिंची लागुनि ठेली!
ध्यास अंतरीं लागुनि गेला
तिनें भाकली अपुली 'करुणा'
शूर्पणखेला दे न-रुकार!
तिची उडाली दैना! दैना!
गंधाचें जणुं झिजलें खोड
सार्थक नाहीं येउनि जगतीं
वनांत आली हताश बाला
जीव देउनी व्हावें ठार!
वेडावुनि ती धांवत जाई
उडी टाकली किंचाळून
कानांवर तो येई वाटे!

* * *

लांच आणखी वशिला मोठा
नकली मालाला ये भरती
शाहणा त्याचा बैल रिकामा
काव्यकलेचें होत न चीज
काय अशा रसिकांत रहावें
छापित नाहीं कविता कोणी
जगास ऐशा जावें सोडुन
यापरि त्रागावून कवीनें
केला मोठा गाजावाजा

प्रयत्न त्यांच्यावांचुनि खोटा
खऱ्याखुऱ्याला पडते भ्रांती
कोणि न कोणा येई कामा
व्यर्थ कवी तो सोसे झीज
काव्य लिहावें, गाणें गावें?
कुठवर लावायाचें × × ?
वनीं रहावें स्वस्थ पडून!
उठुनी लोकांतून हटानें
गर्जत हा का ध्वनी तयाचा?

* * *

ध्वनि-प्रयोजन कळलें नाहीं
व्यर्थ श्रमलों, झालों बहिरा !
ध्वनि-प्रयोजन कळुनी चुकतें
खेंचित त्याला ध्वनिकाव्यांत
ऐकिव असल्या ध्वनिचें ज्ञान
तोंवर माझी स्फूर्ती मस्त

उद्भिजही सांपडलें नाहीं
बहिरा ! बहिरा ! बहिरा ! बहिरा !
उद्भिज त्याचें वा सांपडतें-
शिमग्याचा बघुनी सुमुहूर्त !
अल्प होतसे जोंपर्यंत न
मूग गिळोनी बसेल स्वस्थ !!

प्रकाशन—विहार

चाल—नृपममता

## भ्रमर

बालकवि:—

" हा भ्रमर सदोदित दादा
उद्यानीं कसला धंदा । आचरी
गुणगुणुनी गाणें गाई
प्रति फुला-फुलावर जाई । क्षणभरी
सौगंध सेवुनी त्यांचा
सेवितो गोड मधु तैसा । कितितरी
जरि कळया फुलें त्या भावीं
प्रीतीची त्यांना लावी । माधुरी
यापरी । करुनि मैतरी । वंचना करी ।
शेवटीं तोच—
आवडतो का न कुणास । वद तरी ?"

बाप:—

" ठक कुणास वद आवडला ?
वेडा तूं हो नच बाळा । त्यापरी
भुंग्यासम प्रेमळ गाणीं
करुं नकोस तूं देखोनी । 'सुंदरी'!
वर्णण्यास तीच्या लीळा
काव्य-स्फूर्ति-पान्हा सगळा । आवरीं

पकेरी मुली अज्ञान
देउं तूं नको त्या ज्ञान। आसुरी
शाहिरी। काव्य-चातुरी। दाखवी खरी।
द्यावया स्फूर्ती!
लाभेल तुला मग कीर्ती। कधिंतरी "।

गजाननाची मूर्ति घडवावयास जावें आणि 'माकड' व्हावें त्याचप्रमाणें सद्-रद्दू कविता 'गूढगुंजनात्मक' लिहिण्याचा निर्धार केला असतांनाही ती 'मूढ-गुंजनात्मक' (!) व्हावी यापेक्षां दुर्दैव तें कोणतें ? कै० गडकऱ्यांचें अंधानुकरण करणाऱ्या 'भगतांनो!' हा सुद्धां आचरटपणाचा मासलाच नव्हे का ?'

प्रकाशन—विहार

## उंदराची मावशी

जाति—फुलवेल

काळ न वेळ— ही घूस पाडिते बीळ ! ॥ ध्रु० ॥
नवीन असुचा वाडा सुंदर
स्वच्छ असे हा किती खरोखर
वसती त्यांत न जरी चिकार
परस्पर एक— राहते घूस बिनधोक !
जुने पुराणे वाडे पडले
तिथें न जाणें तिज आवडलें
सत्तेपुढती कांहिं न चाले
व्यर्थ धुडगूस— वाड्यांत घालिते घूस !
बेपर्वा ही धरण्याविषयीं
बेपर्वा ही मरण्याविषयीं
भीति न शिवते तिला कधींही
कर्दनकाळ— फिरते ती सोडुनि बीळ !
ढेंकुण, पिसवा, मच्छर प्राणी
औषधास ना येथें कोणी
घूस एकटी प्लेगामधुनी—
उठवि कपाळें— वाड्यांत पाडुनी बीळ !

प्रकाशन—शालापत्रक

# पत्नी-प्रेम-विहार

वृत्त--शार्दूलविक्रीडित

पत्नीच्या हृदयीं कसें वसतसे सत्प्रेम अव्याहत ?
त्याचें गूढ कुठें, कशांत भरलें, नाहीं मुळीं माहित !
नेत्रां तें न दिसे सदैव म्हणुनी का आंधळें भासतें ?
वेडें वा म्हणतांच का उलट तें वेडावुनी टाकितें ?

' कामाला मजला उठीव सखये ! मोठ्या पहांटे तरी '
जेव्हां मी तिज सांगुनी पहुडतों रात्रीं सुशय्येवरी !
साडेपांचहि वाजतात न कुठें बोले प्रिया स्पर्शुनी–
' नाथा ! झोंप पुरे–चहा पिउनि हा, घ्या स्नान आटोपुनी ' !

पोरांचें करण्यांत कौतुक तसें पत्नीसवें गुंजन !
जाते लोटुनि ती सकाळ सगळीं कामें तशीं राहुन !
जेवाया मज घालुनी मग विडा देऊन ती बोलते–
' जा जा लौकर ऑफिसांत, तुमचें ना लक्ष गुंतो इथें ' !

कामाच्या अगदीं ढिगांत बुडुनी जातां कचेरींत मी
सुट्टी होउनि स्व-गृहीं परततां दारांत कांता उभी !
बोले–' वाट बघून मीच थकलें आतां करूं जेवण,
आहे सुंदरशी हवा वितरली येऊं चला हिंडुन ' !

स्फूर्ती दाटुनि जेधवां लिहित मी एकांतिं काव्यें-कथा
येते झोंप कुठून ?–रात्र न कळे होते कितीशी तदा !
अर्धी रात्र सरे; म्हणे–'अजुनि हा का नाद नाहीं पुरे ?
घ्या ना झोंप अतां तुम्हांस्तव किती जागून काढूं बरें ?

घेऊनी श्रम, काळजी मम करी दासी न ती स्वामिनी
देई सौख्य मला अलौकिक खरें संसारयात्रेंतुनी !
प्रेमें मद्हृदयामधील अखिल प्रेमां तिनें जिंकलें
दिव्य प्रेम असें जगीं मिळत ना कोठें जरी धुंडलें !!

प्रकाशन—विहार

## पत्नी-प्रेम-विहार

वृत्त--शार्दूलविक्रीडित

पत्नीच्या हृदयीं कसें वसतसे सत्प्रेम अव्याहत ?
त्याचें गूढ कुठें, कशांत भरलें, नाहीं मुळीं माहित !
नेत्रां तें न दिसे सदैव म्हणुनी का आंधळें भासतें ?
वेडें वा म्हणतांच का उलट तें वेडावुनी टाकितें ?

' कामाला मजला उठीव सखये ! मोठ्या पहांटे तरी '
जेव्हां मी तिज सांगुनी पहुडतों रात्रीं सुशय्येवरी !
साडेपांचहि वाजतात न कुठें बोले प्रिया स्पर्शुनी–
' नाथा ! झोंप पुरे–चहा पिउनि हा, घ्या स्नान आटोपुनी ' !

पोरांचें करण्यांत कौतुक तसें पत्नीसवें गुंजन !
जाते लोटुनि ती सकाळ सगळीं कामें तशीं राहुन !
जेवाया मज घालुनी मग विडा देऊन ती बोलते–
' जा जा लौकर ऑफिसांत, तुमचें ना लक्ष गुंतो इथें ' !

कामाच्या अगदीं ढिगांत बुडुनी जातां कचेरींत मी
सुट्टी होउनि स्व-गृहीं परततां दारांत कांता उभी !
बोले–' वाट बघून मीच थकलें आतां करूं जेवण,
आहे सुंदरशी हवा वितरली येऊं चला हिंडुन ' !

स्फूर्ती दाटुनि जेधवां लिहित मी एकांतिं काव्यें-कथा
येते झोंप कुठून ?–रात्र न कळे होते कितीशी तदा !
अर्धी रात्र सरे; म्हणे–'अजुनि हा का नाद नाहीं पुरे ?
घ्या ना झोंप अतां तुम्हांस्तव किती जागून काढूं बरें ?

घेऊनी श्रम, काळजी मम करी दासी न ती स्वामिनी
देई सौख्य मला अलौकिक खरें संसारयात्रेंतुनी !
प्रेमें मद्हृदयामधील अखिल प्रेमां तिनें जिंकलें
दिव्य प्रेम असें जगीं मिळत ना कोठें जरी धुंडलें !!

प्रकाशन—विहार

## कवि हा सृष्टीचा गवई

वृत्त—वसन्त

निसर्गाच्या निवाऱ्याचें खुलें जें स्थान सुखदायी
तिथें ये शारदामाई !–कवी हा सृष्टिचा गवई !

जिवाला स्वास्थ्य ना लाभे कुठें गांवांत राहून
खळांच्या दुष्ट संसर्गें जहालों पार हैराण !

सुखाचा शब्द बोलाया मिळेना एकही प्राणी
मला जो भेटतो कोणी जिव्हारीं घाव तो हाणी !

मुळाशीं दैन्य हें माझें कुणाला दोष देऊं मी ?
रहावें दूर एकांतीं गढूनी आपुल्या कामीं !

कुणाचा जाच ना व्हावा म्हणूनी येथ मी आलों
खरें सौंदर्य सृष्टीचें बघूनी अंतरीं धालों !

जिवाला पूर्ण विश्रांती कराया सृष्टिचें गान
वनीं स्वच्छंद रमतांना कशाचें ना उरे भान !

खळाळा सारखी वाहे नदी ही स्वच्छ पाण्यानें
तिच्या कांठांस जोमानें वसंतीं बहरलीं रानें !

लता झाडें पहा सारीं कशीं फोफावुनी जाती
फुलांच्या विविध रंगांनीं भरे डोळ्यांत तत्कांती !

भरारा वाहतो वारा नव्या जोमांत येऊन
हताशी चित्तवृत्तीला क्षणीं टाकी विकासून !

खगांचें गान तें जाई दिगंतीं व्यापुनी सर्व
अहा ! कानीं पडूनी तें मिळे आनंद स्वर्गीय !

सुखाचें स्थान हें ऐसें गमे सोडून ना जावें
रमूनी सृष्टिसौंदर्यी सदा सत्काव्य निर्मावें !

मनीषा अंतरींची ही यशस्वी व्हावया खास
कृपा तूं शारदे ! दावीं तुझ्या ह्या लीन दासास !

कृपादृष्टी तुझी होतां कशाचें ना मला न्यून
रचूनी सृष्टिचीं गाणीं जनांना वेड लावीन ! !

प्रकाशन—सत्यवादी

## पत्रें लिहिलीं तर—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

पत्रें तूं लिहिलींस जीं प्रियकरा ( ? ) हुकूंन माझ्यावरी
कोठें धाडुं नकोस तीं पण तुला मी सांगतें तें करीं !
त्वन्नेत्रीं भरलें स्वरूप मम हें वेळांत थोड्या जरी–
होशी तूं न मला पसंत म्हणुनी, घेतें परीक्षा खरी !

पत्रांचीं जमवोनियां सकल जीं ठेवीयलीं बंडलें
लावी आग तयांस, तूं न अगदीं पाहून मागें पुढें !
जेव्हां होइल राख पूर्ण सगळी–फासून अंगावर
संन्यासी बनुनी तुला गिरिवरी जाणें असे सत्वर !

योग्यांच्यासम तूं समाधि अपुली लावून रात्रंदिनीं
एकांतांत बसून ध्यान करणें !—( माझें कधीं ना मनीं ! )
आशा वाहुं नकोस ती–' मिळुनियां गेली सुभद्रा जरी–
अर्जूनास;'–तरी तुला न दिसणें मद्देह जन्मांतरीं ! !

प्रकाशन—वसुंधरा

# वधूसंशोधन

जाति— **भूपतिवैभव**

मित्र :— तुज गड्या आवडे कोण सुंदरी फार ?
श्रीमंत कुमारी बाप जिचा सरदार !

कवि-वर :— छे ! जरी थोर ती तिला धनाची हांव
हटवादी वेडी करूं घेउनी काय ?

मित्र :— मग कॉलेजांतिल हवी तुला का तरुणी
का सुंदर विधवा सांग गुलाबी राणी ?

कवि-वर :— छे ! नको पोर ती शिकणारी अभिमानी
अन् मुळीं नावडे दुसरी 'सद्गुण–खाणी' !

मित्र :— मग मराठमोळी हवी तुला का साधी
का जनानखान्यांतली बिबी एखादी ?

कवि-वर :— छे ! खेडवळीला बळें वरावें कोणीं ?
मज रुचे न बघण्या 'म्हैस' तशी डोळ्यांनीं !

मित्र :— मग गड्या ! तुला रे नको वधू का कोणी ?

कवि-वर :— 'दे गाणारी मज कवियित्री आणोनी' !!

'नाथा'! पाहुनियां 'स्वयंवर' तुझें, हें होय–'संशोधन'!
कवि—'साधु कीं सैतान'?

प्रकाशन— **सत्यवादी**

## पत्रें लिहिलीं तर—

वृत्त—शार्दूलविक्रीडित

पत्रें तूं लिहिलींस जीं प्रियकरा (?) हुरळून माझ्यावरी
कोठें धाडुं नकोस तीं पण तुला मी सांगतें तें करीं!
त्वन्नेत्रीं भरलें स्वरूप मम हें वेळांत थोड्या जरी—
होशी तूं न मला पसंत म्हणुनी, घेतें परीक्षा खरी!

पत्रांचीं जमवोनियां सकल जीं ठेवीयलीं बंडलें
लावी आग तयांस, तूं न अगदीं पाहून मागें पुढें!
जेव्हां होइल राख पूर्ण सगळी—फासून अंगावर
संन्यासी बनुनी तुला गिरिवरी जाणें असे सत्वर!

योग्यांच्यासम तूं समाधि अपुली लावून रात्रंदिनीं
एकांतांत बसून ध्यान करणें!—(माझें कधीं ना मनीं!)
आशा वाहुं नकोस ती—' मिळुनियां गेली सुभद्रा जरी—
अर्जूनास;'—तरी तुला न दिसणें मद्देह जन्मांतरीं!!

प्रकाशन—वसुंधरा

# वधूसंशोधन

जाति— भूपतिवैभव

मित्र :— तुज गड्या आवडे कोण सुंदरी फार ?
श्रीमंत कुमारी बाप जिचा सरदार !

कवि-वर :— छे ! जरी थोर ती तिला धनाची हांव
हटवादी वेडी करूं घेउनी काय ?

मित्र :— मग कॉलेजांतिल हवी तुला का तरुणी
का सुंदर विधवा सांग गुलाबी राणी ?

कवि-वर :— छे ! नको पोर ती शिकणारी अभिमानी
अन् मुळीं नावडे दुसरी 'सद्गुण-खाणी' !

मित्र :— मग मराठमोळी हवी तुला का साधी
का जनानखान्यांतली बिबी एखादी ?

कवि-वर :— छे ! खेडवळीला बळें वरावें कोणीं ?
मज रुचे न बघण्या 'म्हैस' तशी डोळ्यांनीं !

मित्र :— मग गड्या ! तुला रे नको वधू का कोणी ?

कवि-वर :— 'दे गाणारी मज कवियित्री आणोनी' !!

'नाथा'! पाहुनियां 'स्वयंवर' तुझें, हें होय–'संशोधन'!
कावि—'साधु कीं सैतान'?

प्रकाशन— सत्यवादी

## मी आणि मिशा

वृत्त—शार्दूलविक्रीडित

" आईबाप तुझे जिवंत असतां तूं कां मिशा काढिशी ?
तूं रे मर्द तरी मुखावर कळा त्याची दिसेना कशी ?
तूं स्त्री नाहिंस, पौरुषत्व मग हें झांकून कां ठेविलें ? "
देतों उत्तर त्यांस मी मज कुणी जे यापरी बोलले !

" नाहीं ठेवित मी मिशा—नच असे मर्जी मनाची तर
स्मश्रूनें मज फायदा कितितरी हो कल्पनेबाहिर !
क्षेत्राहून सनातनी परततीं क्षौरक्रिया होउन
क्षेत्राचें मज पुण्य तेंच मिळतें मी ना कुठें जाउन !

खायाला नच तूप तें मग वृथा लावी मिशांना कुणी
ऐसा पोकळ डामडौल करितों मी ना मिशा काढुनी !
घेतों पेय ' मिशाळ ' तो निज मिशा हातें करूनी वर
तो ना त्रास मला कधीं पडतसे नाहीं मिशा तोंवर !

नाहीं पीळ भरावया मज मिशा एका प्रकारें बरें
घ्याया सूड कुणावरी मम मनीं ' काळें ' कधीं ना शिरे !
' मी देईन मिशी पहा उतरुनी '— हा गर्व ना वाहिन
नाहीं ज्यांस मिशा,— कधीं कुठुनि त्या जातील खालावुन ?

वारंवार नव्या तऱ्हा चहुंकडे होती मिशांच्या अती
राखूं मीच कशा ? विचार पडुनी– कुंठीत होते मती !
‘ रागावून मिशांवरी ’– मज म्हणा– ‘ मीं चाट त्यांना दिली ’
वा ‘ त्यांना उतरावयास कवणा संधी न मीं ठेविली ’ !

काढूनीच मिशा खरोखर सदा तारुण्य मी राखतों
येई वृद्धपणा– तरी वय किती ?– चोरून तें ठेवितों !
अन् जेव्हां सहचारिणी मज मुदें भेटावया येतसे
ओठांना मच होउनी अडथळा– घेतों मुके गोडसे ” ! !

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..............
ठाणे.

प्रकाशन— वसुंधरा

## गांधिलमाशी

जाति—फुलवेल

के० माधवानुजांस एक दिवस ' विंचू ' चावला ! त्याच्या वेदना इतक्या असह्य झाल्या, कीं ते चोवीस तासपर्यंत बिछान्यावर सारखे तळमळत होते. कर्मधर्मसंयोगानें एका नवख्या कवीस ( टीकेची ) ' गांधिलमाशी ' डसली. तिच्या वेदनांमुळें त्या कवीची फार दुर्धर स्थिति झालीच झाली; परंतु त्यांतही त्याला जो काव्यस्फूर्तीचा पान्हा फुटला तो असा—

दुःसह ऐशी— डसली मज गांधिलमाशी ! ॥ ध्रु० ॥
सर्वांगाचा झाला होम
कीं आगीचा उसळुनि डोंब
व्यर्थ कराया लावी बोंब
हाय जिवाशीं— डसली मज गांधिलमाशी !
दिसावयातें क्षुद्र खरोखर
परी तियेचा दंश भयंकर
करपुनि काढी कोमल अंतर
जीवननाशी— डसली मज गांधिलमाशी !
कोठुनि मजला चढली धुंदी
काव्योद्यानीं शिरलों नंदी
तिथें न मिळतां कसली चंदी
उलट अंगाशीं— डसली मज गांधिलमाशी !
कवी असें मी अगदीं नवखा
म्हणून कोणी निंदक बांका
नांवें माझ्या मारी हांका—
बसुनी राशीं— डसली मज गांधिलमाशी !

'अपहारा'नें[२] कविता कांहीं
वाशिला लावुनि छापविल्याही
'उदो' न करितां एकानेंही
मात्र अधाशी[३]— डसली मज गांधिलमाशी
नवीन कसली कृति करतांना
डसती माझा कित्येकांना
घे देवा ! तरि पाहुनि त्यांना—
देउनि फांशी— डसली मज गांधिलमाशी !

(१) हा अश्लील (?) शब्द काव्यांत घुसडल्याबद्दल उदार (!) रसिकांनीं क्षमा करण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण खिस्तवासी रे. टिळक यांनीं 'बोंबाबोंब' ह्या कवितेंत तो उघडउघड उपयोजिला आहे, व तसेंच 'पांचजन्य' या शिमग्याच्या विशेषांकांत एका शीघ्र कवीनें 'मी बोंब मारूं कसा ?' म्हणून एका कवितेंत घसा खरडून शंख केला आहे.

(२) अर्थात् येथें एका प्रसिद्ध कवीच्या नांवाचा 'अपहार' केला होता, हें आधींच सूचित केलेलें बरें ! नाहींतर ×× पूर व ×× पूर येथील दोन विद्वान् व जाड्या कवि प्रोफेसरांच्या लठ्ठालठ्ठींत हा पुण्याचा नवखा कवि मात्र नाहक चिरडला जायचा !

(३) नुकत्याच तयार झालेल्या 'साहित्या'वर कोणता टीकाकार अधाशी-पणाचा हक्क अगोदर गाजवीत नाहीं ?

३।५ ११२८ ता.

प्रकाशन—विविधवृत्त

## मळमळ

जाति—अवनी

दऱ्याखोऱ्यांत हिंडणाऱ्या शाहिराला एकसारखी 'तळमळ' लागते. प्रयत्नांतीं प्रसिद्धीस न येणाऱ्या नवख्या कवीस 'मळमळ' तरी कां सुटूं नये

कधिं प्रसिद्ध कविता ह्या व्हायच्या कळेना
करिं अचाट मी प्रयत्न विजय तो मिळेना ! ॥ ध्रु० ॥

सतत बसुनि रात्रंदिन
निर्मितसें काव्य-कुरण[१]
छापुनि परि एकही न
दृष्टितें दिसेना !

शाहिर, कवि सान थोर
काव्य-वृष्टि करिति घोर
दृश्य बघुनि तें समोर
स्फूर्ति आवरेना !

छापविण्या काव्यनिधी
आटविला रुधिरुदधी
संपादक 'वैद्य'[२] कधीं
विकृती बघेना !

‘ स्त्री ’ वनुनी मासिकांत
कविता जरि धाडिल्यात
बिंग फुटुनि दशदिशांत
होय मात्र दैना !

पैसा मम खर्चुनीच
काव्यग्रंथ छापण्यास
विनविलें प्रकाशिकेस
परि रुकार दे ना !

‘ ज्ञानागर ’ मुंबइचें
निवडीना मम ‘ वेंचे ’
अन् प्रो. ‘हिज् मास्टर’चें
गान मम करेना !

सतत मिळविण्यास नांव
धडपडतों तरि न वाव
कवितेची कठिण हांव
अजुनही जिरेना !

‘ हा नाद सोड सोड ’
मित्र करिति बोध गोड
मरणाविण दुष्ट खोड
जायची कधीं ना !

मळमळ ही नित्य अशी
नच देई सुख, सरशी
पाडुनियां तोंबवशीं—
अंतही करेना ! !

(१) कवींनीं 'जिवाचें रान' केलें कीं 'काव्याचें कुरण' निर्माण झालेंच म्हणून समजा.

(२) मोठमोठ्या विद्वान् स्त्री-पुरुषांना डॉक्टरी ज्ञानाचा गंधही नसतांना 'डॉक्टर' ही पदवी मिळालेली दृष्टीस पडते. तदनुसार मासिक पत्रांच्या प्रसिद्ध संपादकांना आयुर्वेदाची माहिती नसली तरी 'वैद्य' पदवी बहाल करण्यांत कोणतीच हरकत नाहीं. मात्र ज्या संपादकांना आपलें पत्र अगर मासिक चालविण्याची ऐपत किंवा ज्ञान नसेल त्यांना 'वैदू' म्हणून खुशाल संबोधावें! बृहन्महाराष्ट्रांत असल्या अधिकारी वैदूंची पैदास कांहीं कमी नाहीं !

प्रकाशन— विविधवृत्त

## कविता-गायन

जाति—बालमुकुन्द

मम कवन कुणा हें गाऊं रसिकांविना ?
क्षण कुणी जरी, श्रवुनि घे तरी-प्रसन्नता ये मना ! ॥ ध्रु० ॥

मज कवी न कोणी म्हणती कांहीं खरा
वा शाहिर नसुनी गोंधळ करितो पुरा
कीं बेसुर कोणी म्हणती गातो जरा
ह्या अपशब्दांनीं घडति जिवा यातना !

करि 'गिल्ला'[१] कोणी पडावया मी फशीं
क्षणभरांत त्यांची मर्जी जाते कशी ?
अन् त्यांत कोडुनी मिळतां 'अंर्डी-भर्जी'
करि जखमेवरती प्रताप अपुला चुना !

गंधर्व-कवींचें[२] गान तुम्ही ऐकतां
वा श्वान भुंकतां मुकाटही सोसतां !
मग तुम्हीच माझें ऐका गाणें अतां
'हो दगड-देव तो'- तुमच्यावांचुनि कुणा ?

(१) साहित्यसंमेलनांत अगर कॉलेजांतून कवितागायनाच्या प्रसंगीं नवख्या कवींवर जो गिल्ला ( Attack ) करण्यांत येतो तो कुणास ठाऊक नाहीं ?

(२) 'गंधर्व' हे कोणी कवि नसून चांगल्यापैकीं काव्य-गायक आहेत असे कवि.

प्रकाशन—विविधवृत्त

तारका

वृत्त—पृथ्वी

सुरम्य किति तारका चमकती नभःप्रांगणीं
जणूं उधळलीं फुलें धवल जाइचीं तीं कुणीं!
प्रशांत समयास वा फुटुनि स्वर्गभांडार तें
जवाहिर तयांतुनी गळुनि काय सारें पडे!

सुनील गगनोदरीं उदय पावता चंद्रमा
तयास करि माळ का रजनिदेवता ती रमा!
फुलें खुडुनियां तिनें उपवनांतुनी कोठल्या
प्रफुल्ल कुसुमासवें कितिकही कळया गुंफिल्या!

सुहास्य उधळोनियां विलसतात ज्या तारका
जणूं गंमत शालिनी नविन त्या वधू-बालिका!
सुखें विहरतात कीं प्रणय-बालिका थिल्लर
सुधांशुनृपभोंवतीं विनत कीं स्त्रिया-किंकर!

समग्र गगनांगणीं पसरला रुपेरी चुरा
कुणी?—कळत ना कुठें फुटतही पयाचा झरा!
गुणी सकल अप्सरा जमुनि का नभोमंदिरीं
सुरेख नव गालिचा सुखद काढिला भर्जरी!

भयाण पसरी तमःपटल रात्र सृष्टीवरी
म्हणून सुखवावया जळत दीप हे का तरी?
जसे हरितशा तृणांतुनि चकाकती काजवे
नभांतुनि निळया तसे हंसति तारकांचे थवे!

प्रसन्नवदना दिसे गगन-देवता हांसरी
निळें गगन तें तिचें गमत शालुवस्त्रापरी !
असंख्य टिकल्या अती धवल चांदण्या त्यांवर
फुलें डंवरलीं लतेवर-नव्हे-खुले सुंदर !

गमे गगन कीं लतासदन, त्यांत तारे कुणी
तुषार उडले जणूं जलद-पुष्करीणींतुनी !
प्रसन्न मधुमक्षिका भुलुनि चंद्रपद्मास त्या
सुखांत जणुं टाकिती-हंसत भेटण्यासी उड्या !

रवी उगवतां नभीं तुटति तारका चंचल
भिऊन जणुं शत्रुला लपति अंगना दुर्बल !
मला गमत तारके ! लढत वीर जे लोपले
पुन्हा अवतरोनि, ह्या जगतिं धन्यता पावले ! !

REFBK-0005369
REFBK-0005369

प्रकाशन—विविधज्ञानविस्तार; ज्ञानप्रकाश

